शनिवार, २ मार्च २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १९१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 2 MARCH 2024 adhunikkesari.com • YEAR-03 • ISSUE-191 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05

# नमो रोजगार मेळाव्याच्या पत्रिकेवर शरद पवारांचे नाव

## वादानंतर प्रशासनाची सारवासारव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : नमो रोजगार मेळाव्याच्या कार्यक्रम पत्रिकेत शरद पवारांचे नाव टाकण्यात आले असल्याची माहिती सूत्रांच्या हवाल्याने समोर आली आहे. वादानंतर प्रशासनाची सारवासारव केल्याचे म्हटले आहे. बारामतीमध्ये शनिवारी नमो रोजगार मेळावा पार पडणार आहे. गुरुवारी सुप्रिया सुळे यांना दिलेल्या पत्रिकेत शरद पवारांचे नाव नव्हते. मात्र, आता कार्यक्रमाच्या नवीन पत्रिकेत शरद पवारांचे नाव असल्याची 'एबीपी माझा'ला माहिती मिळाली आहे. गुरुवारी निमंत्रण पत्रिकेवर झालेल्या वादानंतर आता सारवासारव केल्याची माहिती समोर आली आहे.**



नमो रोजगार मेळाव्याच्या निमित्तानेबारामतीमध्ये येणाऱ्या राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना शरद पवारांनी निमंत्रण दिले होते, पण व्यस्ततेच्या कारणामुळे आपल्याला हे शक्य होणार नसल्याचं सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हे निमंत्रण नाकारले आहे. त्या संबंधित त्यांनी एक पत्रही शरद पवारांना लिहीले असून त्यांचे आभारही मानले आहेत. सोबतच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांनीही नियोजित कार्यक्रमांच्या व्यस्ततेमुळे निमंत्रण नाकारल्याची माहिती आहे. शनिवारी, 2 मार्च रोजी बारामतीमध्ये नमो रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं असून त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत. बारामतीमध्ये शरद पवारांचे निवासस्थान असल्याने त्यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना जेवणाचे निमंत्रण दिलं आहे. पण व्यस्त कार्यक्रमांमुळे आपण या जेवणासाठी हजर राहू शकणार नाही असं देवेंद्र फडणवीसांनी नम्रपणे सांगितले आहे.



नमो रोजगार मेळाव्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार बारामतीत येणार आहेत. जुलै 2023 मध्ये पवारांविरोधात उघड भूमिका घेणारे अजित पवार या भोजनाला जातात का ते पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. कारण दिवाळीनंतर पवार काका-पुतण्या समोरासमोर आलेले नाहीत. अलीकडेच अजित पवारांनी अनेकदा आपल्या काकांवर सडकून टीका देखील केलीये. त्यामुळे शिंदे, फडणवीस यांनी जर भोजनाचे निमंत्रण स्वीकारले, तर अजित पवारही ते स्वीकारणार का ते पाहावे लागेल. बारामती विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शनिवारी आणि रविवारी नमो रोजगार मेळावा पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या शनिवारी दिलेल्या निमंत्रण पत्रिकेमध्ये शरद पवारांचे नाव नव्हते, यानंतर सरकारवर टीका करण्यात येत होती. शरद पवार हे राज्यसभेचे खासदार असून ते राज्यसभेचे प्रतिनिधीत्व करतात, या कार्यक्रमाला राज्यातील लोकप्रतिनिधींना निमंत्रण नाही, असा अर्थ होतो, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले होतं. यानंतर आता सरकारने सारवासारव करत नवीन निमंत्रण पत्रिका काढली असून त्यामध्ये शरद पवाराचे नाव नमूद करण्यात आले आहे.

# वाघाच्या शिकारीवरून अडचणीत आलेल्या संजय गायकवाडांवर आणखी एक गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** येथील शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या अडचणीत आणखी वाढ होतांना दिसत आहे. नुकतेच आपण वाघाची शिकार करुन त्याचा वाघनख गळ्यात लॉकेट म्हणून घातल्याचा दावा करणारा एका व्हिडिओमुळे अडचणीत आलेल्या गायकवाड यांच्या विरोधात जमीन बळकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेची शेतजमीन हडपून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून संजय गायकवाड यांच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोराखेडी पोलिसांनी मोताळा न्यायालयाच्या आदेशावरून बुधवारी, 28 फेब्रुवारीच्या मध्यरात्री कारवाई करत हा गुन्हा दाखल केला आहे. नागपूर येथील रीता यमुनाप्रसाद उपाध्याय (42 , रा. नागपूर) यांची मोताळा तालुक्यातील राजूर शिवारातील गट नंबर 62 मध्ये दीड एकर शेती आहे. 2021 च्या कोरोना काळात आमदार संजय गायकवाड आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी संगनमत करून ही शेतजमीन बळजबरीने ताब्यात घेतली. या जागेवर आमदार गायकवाड यांना अलिशान फार्म हाऊस बांधण्यासाठी सुरुवात देखील केली. या शेतजमिनीवर अतिक्रमण करून शेतीची कुंपणेही त्यांनी काढून टाकले. सोबतच आपण देत असलेल्या दरात शेतजमीन आपल्या नावावर करून द्यावी, असा तगादाही गायकवाड यांनी उपाध्याय यांच्याकडे लावला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.याप्रकरणी उपाध्याय यांनी पोलिसांत तक्रार केली होती. मात्र, पोलिसांनी याविषयी फार दखल न घेता कुठलीही कारवाई केली नाही. त्यानंतर उपाध्याय यांनी मोताळा येथील न्यायालयात धाव घेतली असता, आमदार संजय गायकवाड यांच्यासह त्यांचा चिरंजीव मृत्युंजय गायकवाड, सोमनाथ चौबे, दिपाली चौबे आणि ज्ञानेश्वर वाघ यांच्यावर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोराखेडी पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक सारंग नवलकार यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय राजवंत आठवले हे करीत आहेत. आमदार संजय गायकवाड यांनी 19 फेब्रुवारी रोजी आयोजित शिवजयंती कार्यक्रमात आकर्षक पेहराव केला होता. हातात तलवार, डोक्यावर फेटा, गळ्यात मोत्यांच्या माळा असा तो पेहराव होता. त्यावर बुलढाणा येथील एका स्थानिक प्रसारमाध्यमाच्या पत्रकाराने त्यांच्या वेशभूषेसंदर्भात मुलाखत घेतांना प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी गायकावाड यांच्या गळ्यातील लॉकेटबाबत विचारले असता, ते म्हणाले, हा दात वाघाचा असून, आपण स्वतः 1987 मध्ये वाघाची शिकार केली होती.

# मराठा आरक्षणाविरोधात हायकोर्टात याचिका

## गुणरत्न सदावर्तेंकडून 10 टक्के आरक्षणाला आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत असताना आता मराठा आरक्षणाचा वाद हायकोर्टात पोहोचला आहे. उच्च न्यायालयात मराठा आरक्षणावर लवकरच सुनावणी पार पडणार आहे. मराठा आरक्षणाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात सदावर्तेंकडून दिवाणी रिट याचिका दाखल करण्यात आली आहे.




राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेल्या 10 टक्के आरक्षणाप्रकरणी सदावर्तेंनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. डॉ. जयश्री पाटील यांच्याकडून राज्य सरकारने जारी केलेल्या 10 टक्के मराठा आरक्षणाला आव्हान देण्यात आले आहे. 27 फेब्रुवारी रोजी रोस्टर पद्धतीत केलेल्या बदलालाही आव्हान देण्यात आले आहे. याचिकेतून अनेक गंभीर आरोप निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची आयोगाच्या अध्यक्षपदी झालेली नेमणूक चुकीची असल्याचा याचिकेतून आरोप करण्यात आला आहे. तर निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले यांना सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांपेक्षाही जास्त मानधन दिलं गेल्याचा याचिकेतून दावा करण्यात आला आहे. याप्रकरणी आरक्षणाला समर्थन देत विनोद पाटील यांच्याकडून हायकोर्टात कॅव्हेट दाखल झाली आहे. तर, यावेळी कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण दिल्याचा राज्य सरकारचा दावा आहे. लवकरच मराठा आरक्षणाचा लढा हायकोर्टात सुरू होणार असून याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्राकडे आर्थिक आव्हानांना तोंड देण्याची ताकद

## अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : राज्याची आर्थिक स्थिती चांगली असून आर्थिक आव्हानांना तोंड देण्याची ताकद महाराष्ट्राकडे निश्चितपणे आहे. महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट निर्धारित वेळेत गाठण्यात येणार आहे. यादृष्टीने नियोजन केले असून राज्याच्या महसुली उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. आर्थिक शिस्त पाळताना अनावश्यक खर्च टाळण्यात येत आहे. अशा उपाययोजना आणि कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यापुढील आर्थिक आव्हानांवर यशस्वीपणे मात केली जाईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेतील अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना सभागृहाला दिला. विधानसभेत सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी अंतरिम अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण राज्यामधून भाविक कोल्हापूरमधील ज्योतिबा देवस्थानाला भेट देऊन दर्शन घेत असतात. येथील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ज्योतिबा देवस्थान प्राधिकरण स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा चर्चेला उत्तर देताना केली. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील पहिली समिती, पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील दुसरी समिती, उच्चाधिकार समिती आणि शिखर समितीच्या मान्यतेबाबतची कार्यवाहीदेखील गतीने करण्यात येईल, असेही अजित पवार यांनी सांगितले. राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर ५ रुपयांचे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात प्रतिदिन १ कोटी ६० लाख लिटर दूध संकलन होत असून त्यानुसार अनुदान योजनेसाठी २८३ कोटींची आवश्यकता आहे. यापैकी २०४ कोटींचा निधी पुरवणी मागणीद्वारे व उर्वरित निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. योजनेच्या अंमलबजावणीसाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले असून दूध उत्पादक शेतकऱ्यांना थेट लाभ हस्तांतरणाद्वारे त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यात येणार आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. राज्य चालविणाऱ्यांनी नेहमीच मोठी स्वप्ने बघितली पाहिजेत आणि ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सर्व ताकद लावली पाहिजे, असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, देशाच्या पंतप्रधानांनी २०४७ पर्यंत विकसित भारत बनविण्याचे आणि भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये महाराष्ट्राचे मोठे योगदान राहणार असून इतर राज्यांपेक्षा आपले राज्य निश्चितपणे आघाडीवर असेल. राज्य स्थूल उत्पन्नात प्रतिवर्षी १० टक्के वाढ होत असून त्यात भरीव वाढ करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. याद्वारे राज्याने निश्चित केलेल्या कालावधीत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्यात येणार असल्याचा पुनरुच्चारही केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, याआधी अर्थसंकल्पात जाहीर योजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्या आणि अतिरिक्त योजनांसाठी आवश्यक निधींसाठी पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत असे सांगितले. महत्वाच्या योजनांबद्दल माहिती देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आशा स्वयंसेविका मानधन, निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात वाढ केली आहे. नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत, शेतकऱ्यांना एक रुपयात पीकविमा, नमो शेतकरी सन्मान निधी, गरीब-गरजूंना आनंदाचा शिधा अशा महत्वाकांक्षी योजनांसाठी निधीची तरतुद केली आहे असेही सांगितले. महापुरुषांच्या स्मारकांसाठी केलेल्या तरतुदींसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, राज्याला समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे, गौरवशाली इतिहास आहे. या वारशाचा, महापुरुषांचा सन्मान करण्यासाठी स्मारके आवश्यक आहेत. त्यांच्यासाठीही निधीची तरतूद केली आहे. मुंबईतील इंदू मिल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम गतीने सुरु आहे. या स्मारकासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यातील स्मारकांची घोषणा अंतरिम अर्थसंकल्पात केली आहे. या स्मारकासाठी कराव्या लागणाऱ्या भूसंपादन व इतर बाबींसाठी लागणाऱ्या खर्चासाठी पुरवणी मागण्यांद्वारे निधी देण्यात येईल, अशी ग्वाही देखील दिली.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

***हे हिंदुशक्ती संभूत दीप्तितम तेजा***
***हे हिंदू तपस्या- पूत ईश्वरी ओजा***
***हे हिंदुश्री सौभाग्य-भुतीच्या साजा***
***हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा.***

आधीच्या लेखात सावरकरांच्या कार्यावर थोडा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला होता. सावरकरांची त्रिखंडात गाजलेली उडी यानिमित्ताने हा लेखन प्रपंच घडला. सावरकरांवर लिहिताना त्यांच्या मातेसमान असलेल्या येसूवहिनींच्या कार्यावर लिहावं असं वाटलं. आणि त्यातून हा आजचा लेख आपल्यासमोर ठेवतो आहे. आपली भारतीय संस्कृती थोर. आपल्याकडे मोठ्या वहिनीला आईचा मान दिला जातो. तसाच मान सावरकरांनी आपल्या मोठ्या वहिनींना दिला. सावरकरांची आई तर ते लहान असतानाच त्यांना सोडून देवाघरी गेली होती. आईचे प्रेम फारसे लाभले नाही. ती उणीव भरून काढली येसूवहिनींनी. ' जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसी ' असे म्हटले जाते. म्हणजे जननी आणि जन्मभूमी या स्वर्गापेक्षाही महान आहेत. सावरकरांच्या बाबतीत यात आणखी त्यांच्या वहिनींची भर घालावी लागेल. १९०९ मध्ये बाबाराव सावरकर म्हणजे सावरकरांच्या मोठ्या बंधूंवर खटला होऊन त्यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यावेळी येसूवहिनींवर जणू आभाळच कोसळले. खरं तर ' सुख ' या शब्दाशी येसूवहिनींची भेट कधी झालीच नाही. जसे सावरकरांनी देशासाठी आपले सर्वस्व अर्पण केले, तसेच आपले सगळे जीवन येसूवहिनींनी सावरकर कुटुंबियांसासाठी अर्पण केले आणि जमेल तेवढी देशसेवाही केली. त्या माउलीचे जीवन म्हणजे एक यज्ञच होता. बाबारावांना अटक होऊन जन्मठेपेची शिक्षा झाली, तेव्हा या प्रसंगी आपल्या वहिनींचे सांत्वन करणारी एक अप्रतिम कविता सावरकरांनी लिहिली. त्यात त्यांचा आपल्या वहिनींबद्दलचा आदर प्रकट होतो. ते म्हणतात.. जयासी तुवा प्रतिपाळिले, मातेचे स्मरण होऊ न दिधले श्रीमती वहिनी वत्सले , बंधू तुझा तो तुज नमी. तिला ते म्हणतात तू धैर्याची असशी मूर्ती, माझे वहिनी माझे स्फूर्ती. अशी ही मातेसमान असलेली, धैर्याची मूर्ती आणि स्वातंत्र्यवीरांची स्फूर्ती असलेली ही माउली अत्यंत साधी होती. त्र्यंबकेश्वरच्या फडके घराण्यातील ही कन्या सून म्हणून सावरकर गृही आली . त्यावेळी सावरकर कुटुंब सधन होते.






## आनंदी पहाट

## संपूर्ण जग सुंदर आहे, मात्र तसं बघायला हवं

आधुनिक केसरी

अगदी प्राचीन काळापासूनच आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसं विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरतं निमित्तच ठरत असतं. आयुष्याच्या प्रवासांत सोबत हवी असते, ती विचारांचीच. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतंच असं नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचंच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचं दिसून येत असतं. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे? असा विचार कधी येतो का हो आपल्या मनांत? विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसं मिळेल ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणं महत्वाचं ठरतं. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक आणि मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा आणि आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झालं, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचं दर्शन होतंच राहतं. संपूर्ण जग सुंदर आहे, फक्त तसं पहायला हवं; प्रत्येक नातं जवळचं आहे, फक्त ते उमजायला हवं; प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, फक्त तसं समजायला हवं. ते समाध आणि आनंद आपल्याला मिळत राहायला हव्यात म्हणून सकारात्मक विचार, आचार आणि संस्कार ह्याचं महत्व आपल्याला कळणं आणि अवगत होणं आवश्यक असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## कर्मयोगी जाणा | तोचि संत ||

अखंड स्वधर्म | कर्मात भजावा ||
देव आठवावा | क्षणोक्षणी ||१||
ठेऊनिया स्वार्थ | वागे वेळोवेळा ||
त्यसी अवकळा | येते जाण ||२||
विकाराचा संग | पातकी गोंदण ||
बाभुळ चंदन | होय कैसी ? ||३||
अंतकाळी कोण | येतो रे संगती ||
पाप-पुण्या गती | कर्म देते ||४||
संत सद्गुणांची | करी आराधना ||
कर्मयोगी जाणा | तोचि देव ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हि त गु ज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## गुरुतत्वाचं चैतन्य


या पृथ्वीवर प्रत्येक क्षणी भगवान शिवाचे चिरंतन नृत्य सुरू असते. या नृत्यातून अभिव्यक्त होणारे, प्रसारित होणारे चैतन्य, शिवामध्ये अंतर्भूत महाशक्तीचे एक शक्तीरूप आहे - "या देवी सर्व भूतेष चैतन्य रूपेण संस्थितः। नमस्तस्यै नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नमः॥" ही शक्ती शरीरांतर्गत कुंडलिनी होय. अपार ऊर्जा, चैतन्याने स्फुरण पावणारी ही महाशक्ती भगवती ललिता होय - "सिंदुरारूण विग्रहां त्रिनयनां माणिक्य मौलि स्फुरत। तारानायक शेखरां स्मित मुखी मापीन वक्षोरूहाम।" ही सिंदुरवर्णी, माणिक्यमौली अनंत ऊर्जावान चैतन्य शक्ती कबीराचा 'लाल' रंगाने रंगून जाण्याचा ब्रह्मानुभव आहे. हे गुरूतत्त्वाचे ज्ञानात्मक प्रसारण आहे. गुरूतत्त्व शिवतत्त्व आहे. 'शिवोऽहं गुरू' आदिगुरू या नावांनी संबोधलेले परम प्रकाशमानत्याच्या स्फुरणाने या विश्वात स्पंदन, तरंग, गतिमानता आहे ती अपार ऊर्जा व चैतन्य आहे. या ब्रह्मांडात चैतन्याचा महासागर हेलावतो आहे. त्याची प्रत्येक लहर-तरंग सर्वांना स्पर्शून जाते आहे. मी चैतन्यात आहे, माझ्यात चैतन्य आहे, मला नित्य चैतन्याचा स्पर्श होतो आहे, मी चैतन्याने न्हाऊन निघत आहे, मी चैतन्याचा एक भाग आहे, अशा प्रकारचे अनुभव स्फुरण सतत होणे म्हणजे गुरूतत्त्वाच्या ज्ञानाची जाणीव होणे आहे.संत ज्ञानेश्वरांच्या मतानुसार 'अ'कार, 'उ'कार, 'म'कार (ब्रह्मा, विष्णु, महेश) या तिन्हीं मात्रा एकवटणारे, संपूर्ण वेदज्ञान सामावून जाणारे केंद्र म्हणजे गुरुतत्त्व होय. गुरुतत्त्व सर्वांगाने ज्योतिर्मय आहे. सर्वांगाने ते लयबद्ध आहे. या गुरुतत्त्वाठायी इच्छा, ज्ञान, क्रिया हे तिन्ही विलीन होतात. इच्छातत्त्व लाल वर्णाचे 'ब्रह्मा' स्वरूप आहे. क्रिया किंवा कर्म स्वरूप नीळे सावळे 'विष्णु' स्वरूप आहे. ज्ञान धवल शुभ्र वर्णाचे 'शिव' स्वरूप आहे. या तिन्हींचा समावेश होऊन शब्दांच्या पलीकडले जे निखळ, आनंदपूर्ण, अखंड शेष रहाते, ते गुरूतत्त्व होय.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

योग युक्ति से कमल सब,
सिधा ऊर्ध्व मुख होय ।
विकशित खेल रहस्य है, अनुभव
अद् भुत सोय ।।४६।।(स्वर्वेद
प्रथम मण्डल प्रथम अध्याय)
०१/०१/४६

मूळ भाष्याचा मराठी अनुवादः समस्त ज्ञानांच्या प्राप्तीसाठी सर्व क्षेत्रात तत्त्वज्ञान आहे, ज्याद्वारे ती कार्ये संपादन केली जातात. तद्वतच अध्यात्म क्षेत्रात योगी पुरुषांजवळ अशी युक्ती असते ज्याद्वारे ते अष्टकमलांचे मुख ऊर्ध्वमुख करतात. ग्रंथकार सद्गुरू देवजी महाराज या क्रियेला योग्यांची लीला किंवा क्रिडा म्हणत असत. सद्गुरूंच्या विशेष युक्तीने अष्टचक्र सरळ ऊर्ध्वमुख होऊन जातात आणि ऊर्ध्वमुख झाल्यावरच विकसित होतात ( फुलतात ). या रहस्यमय खेळाने अंतरात जो ज्ञानाचा अनुभव होतो, तो आश्चर्यमय आहे. ही क्रिया सद्गुरूंच्या विशेष अनुग्रहाने पूर्ण भाग्यवान स्त्री-पुरूषांना प्राप्त होते. शब्दां त्याचे वर्णन कसे करता येईल ? ही सद्गुरूंची महान महिमा आणि त्यांच्या विशेष शक्तीचा महान परिचय आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## नाम व प्रारब्धभोग

आधुनिक केसरी



नामाचा संबंध प्रारब्धाशी कसा आहे, असे पुष्कळ लोक विचारतात. हा प्रश्न एका दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. बहुतेक लोक प्रारब्ध टळावे म्हणून नाम घेतात. देहाचे सुखदुःख हे माझेच सुखदुःख आहे, किंबहुना, देह सुखी तर मी सुखी, आणि देह दुःखी तर मी दुःखी, अशी सामान्य मनुष्याची अवस्था असते. बरे, प्रारब्धाचे भोग हे आजपर्यंत कोणालाही चुकले नाहीत. मग कसे करावे ? इथे असे लक्षात ठेवावे की, प्रारब्धाची गती फक्त देहापुरतीच असते; म्हणून, ज्याची देहबुद्धी कमी झाली तो देहाच्या सुखदुःखाने सुखी वा दुःखी होत नाही. नामाने देहबुद्धी कमी होते. म्हणून, नामात राहणारा मनुष्य प्रारब्धाचे भोग भोगीत असताना देखील आनंदात असतो. नामाच्या आनंदापुढे त्याला प्रारब्धाची किंमत राहात नाही. नामाचे सामर्थ्य फार विलक्षण आहे. पूर्वी घडलेले अपराध नाम नाहीसे करते. वाया गेलेल्या माणसांना नाम तारते. नाम हा सर्व प्रार्थनांचा, सेवेचा, पूजेचा राजा आहे. आनंदमय अशा भगवंताचे सान्निध्य नामाने लाभते, आणि त्याची कृपा व्हायला वेळ लागत नाही; किंबहुना ज्याच्यावर भगवंताची कृपा होते त्याच्याच मुखात नाम येते. सर्व काळी, सर्व ठिकाणी, सर्व अवस्थांमध्ये कोणालाही करता येण्यासारखे नाम हेच एक साधन आहे. नामाला उपाधी अत्यंत कमी असल्याने निरुपाधिक भगवंताशी नाते जोडायला नामासारखे साधन नाही. खरोखर, किती प्रकारांनी तुम्हांला मी सांगू ! अखंड नामात राहणे यालाच मोक्ष म्हणतात. अखंड नामात जगणे यालाच पराभक्ती म्हणतात. जो नामात अखंड गुंतला त्यालाच संत म्हणतात. नामात प्रेम येणे ही संतांची खरी खूणच आहे. तेव्हा माझे एवढे ऐका : नामाला कदापिही विसरू नका. प्रारब्धाच्या भोगांना न कंटाळता, भगवंताने ज्या स्थितीत आपल्याला ठेवले असेल त्यामध्ये समाधान माना, पण केव्हाही त्याच्या नामाला विसरू नका. नामाने पापी माणसे पुण्यवान् बनतात. देहबुद्धी कमी होणे हेच पुण्य होय, आणि ते नामाने प्राप्त होते. नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. वाईट किंवा विषयाच्या वासनेने बुद्धी भ्रष्ट करणे हेच कलीचे मुख्य लक्षण होय. त्याच्या मुळावर घाव घालण्याचे काम नाम घेतल्याने होते, म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही आणि प्रारब्धाची क्षिती नाही. नामाने पुण्यशरीर बनते. ज्याच्या अंतरात नाम असते तिथे भगवंताला यावे लागल्याने, त्याच्या शरीरात सत्त्वगुणाची वाढ होते आणि तो पुण्यवान् बनतो. देह प्रारब्धावर टाकून, आणि आपण त्याहून निराळे राहून, जे होईल त्यात आनंद मानावा. भोग प्रारब्धाने येतात असे म्हणण्यापेक्षा ते भगवंताच्या इच्छेने येतात असे म्हटले की समाधान मिळेल.

१९. भगवंताला स्मरून काम करीत असताना. जे योग्य दिसेल ते त्याच्या इच्छेनेच आहे असे समजून काम करावे. जो असे करील त्याला समाधान झालेच पाहिजे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २ मार्च २०२४
adhunikkesari.com

# आमदारांची धक्काबुक्की महाराष्ट्राला लाज आणणारी

## नाना पटोले : खोकेवाल्यांच्या सरकारमध्ये खोक्यांसाठी मारामारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय



अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री दादा भुसे व आमदार महेंद्र थोरवे यांच्यात विधिमंडळाच्या लॉबीत धक्काबुक्की झाली. महाराष्ट्राच्या विधिमंडळात असा प्रकार होणे चुकीचे आहे. भारतीय जनता पक्षाने सुरु केलेल्या राजकारणामुळे सभागृहाचा आखाडा झाला असून विधिमंडळाच्या लॉबीतच आमदारांनी एकमेकांना धक्काबुक्की, मारहाण करणे हे भूषणावह नाही तर महाराष्ट्राला लाज आणणारी घटना आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.आमदारांच्या धक्काबुक्की प्रकरणावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सत्ताधारी आमदारांची जनतेच्या मुलभूत प्रश्नापेक्षा स्वतःच्या, वयैक्तिक प्रश्नांसाठी कुरघोडी चाललेली आहे. विधिमंडळाच्या लॉबीमध्ये मंत्र्यांवर खोक्यांचे आमदार तुटून पडतात हे खोक्याचे प्रकरण असून खोक्यामध्येच चालत राहणार, असे म्हणत या विधिमंडळात झालेल्या या घटनेचा तीव्र निषेध केला.
आमदारांच्या धक्काबुक्कीचा मुद्दा विधान सभेतही उपस्थित करण्यात आला होता. धक्काबुक्कीची ही घटना बाहेर घडलेली नसून सभागृहाच्या लॉबितच घडलेली आहे, प्रकरण गंभीर असून तातडीने माहिती घेऊन यासंदर्भात योग्य ती कारवाई करावी असे नाना पटोले म्हणाले. अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तास हा सदस्यांसाठी महत्वाचे आयुध आहे परंतु या अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तासच ठेवलेला नाही. आपल्या मतदारंसघातील



प्रश्न, समस्या मांडण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास असतो. सदस्यांचा तो अधिकार आहे. सदस्यांच्या अधिकाराचे रक्षण करण्याची अध्यक्षांची जबाबदारी आहे. कोविड काळात अधिवेशनाचा कालावधी कमी ठेवला होता परंतु आताही अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तास ठेवण्यात आलेला नाही. सरकारने विधेयके मंजूर करून घेतली पण जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी सदस्यांना संधीच मिळाली नाही, असे नाना पटोले म्हणाले.

# भाजपा सरकार महिला अत्याचार रोखण्यात अपयशी; दिल्ली, मुंबईतही असुरक्षित

## सव्वालाखे : अत्याचार करणाऱ्यांना भाजपाचे अभय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्ष बेटी बचाओ, बेटी पढाओ, लेक लाडकी, लाडली बहना यासारख्या योजनांचा गाजावाजा करते परंतु त्यांच्या या योजना फक्त जाहिरातबाजीसाठीच आहेत. महिलांबद्दलचा भाजपाचा दृष्टीकोन जगजाहीर आहे. भाजपा सरकारच्या काळात महिलांवरील अत्याचारात वाढ झालेली आहे. NCRB च्या अहवालात महिला अत्याचारात ४ टक्के वाढ झाल्याचे दिसत आहे. भाजपा सरकार महिला अत्याचार रोखण्यात अपयशी ठरले असून दिल्ली व मुंबईसारख्या मोठ्या शहरातही महिला असुरक्षित आहेत, असा आरोप महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे यांनी केला आहे.
यासंदर्भात बोलताना संध्याताई सव्वालाखे म्हणाल्या की, २०२२ मध्ये महिला अत्याचाराच्या ४ लाख ४५ हजार २५६ घटनांची नोंद झाली म्हणजे दरतासाला ५१ घटनांची नोंद झाली. महिला अपहरणाच्या घटनांची १९ टक्के नोंद झाली असून बलात्काराच्या ७ टक्के घटनांची नोंद झाली आहे. राजधानी दिल्लीत २०२० मध्ये १० हजार ९३ घटना घडल्या होत्या त्यात वाढ होऊन २०२१ मध्ये १४ हजार २२७ झाल्या. महिला अत्याचारात उत्तर प्रदेश पहिल्या क्रमांकावर आहे तर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि मध्य प्रदेश तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यातही महिला अत्याचार वाढले असून बलात्कार, विनयभंग, अपहरण आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. विनयभंग आणि छेडछाडीचे सर्वाधिक गुन्हे मुंबईत नोंदवले गेले असून त्यानंतर पुणे आणि नागपूर शहराचा नंबर लागतो. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात ड्रगचे साठे सापडत असून शहरापासून गाव खेड्यापर्यंत शाळा कॉलेजच्या बाहेर ड्रग्ज मिळत आहेत. तरुणाईला बर्बाद करण्याचे काम सुरु आहे.
जगात देशाचे नावलौकिक वाढवलेल्या महिला खेळाडूंवर अत्याचार करणाऱ्या भाजपा खासदार ब्रिजभूषण सिंह वर सरकारने कोणतीही कारवाई केली नाही, तो आजही मोकाट आहे. बिल्कीस बानोवर सामुहिक बलात्कार करुन त्यांच्या घरातील ७ लोकांची हत्या करण्यात आल्याप्रकरणी ११ जणांना जन्मठेप शिक्षा ठोठावली होती पण गुजरात सरकारने त्यांची सुटका केली व भाजपाच्या लोकांनी या गुन्हेगारांचा सत्कार केला नंतर सुप्रीम कोर्टाने त्यांना पुन्हा जेलमध्ये पाठवले. महाराष्ट्रातही महिला अत्याचाराचे गंभीर आरोप असलेले काही लोक मंत्रिमंडळात आहेत, तर काहीजण आमदार खासदार आहेत. महिलांवर अत्याचार करणाऱ्या भाजपा पदाधिकाऱ्यांवर भाजपा कारवाई न करता त्यांना पाठीशी घालते. महिला अत्याचार रोखण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलली पाहिजेत. प्रत्येक गुन्ह्याची नोंद पोलीस स्टेशनमध्ये झाली पाहिजे. पीडितेला संरक्षण दिले पाहिजे व अशी प्रकरणे जलद गती न्यायालयात चालवून दोषींना कठोर शासन केले पाहिजे, अशी मागणीही संध्याताई सव्वालाखे यांनी केली आहे.

# फुटलेल्या पक्षांनी आधी त्यांची ताकद पाहावी

## प्रकाश आंबेडकर : आपण शेवटच्या क्षणापर्यंत थांबू

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रकाश आंबेडकर यांचा वंचित बहुजन आघाडी पक्ष महाविकास आघाडीत येण्यास उत्सूक आहे. परंतु, मविआतील प्रमुख पक्ष आणि वंचितमध्ये अद्याप जागावाटपाचा निर्णय झालेला नाही. तसेच महाविकास आघाडीचा किमान समान कार्यक्रम (कॉमन मिनिमम प्रोग्राम) ठरलेला नाही. तसेच जागावाटपावरून चार पक्षांमध्ये रस्सीखेच चालू असताना ही आघाडी होणारच नाही असा सूर राजकीय वर्तुळात ऐकायला मिळत आहे. प्रकाश आंबेडकर सातत्याने अवाजवी मागण्या करत असल्याचं बोललं जात आहे. अशातच आंबेडकर यांनी आज (१ मार्च) स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवली आहे. तसेच दोन दिवसांपूर्वी वंचित बहुजन आघाडीने राज्यातल्या ४८ पैकी २७ जागांवर आमची ताकद असल्याचं पत्र मविआ नेत्यांना दिलं होतं. त्यामुळे वंचितच्या मविआ प्रवेशाबाबत अनेकांच्या मनात साशंकता आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीने महाविकास आघाडीत जागावाटपासाठी ठेवलेल्या अटी लक्षात घेता चारही पक्षांमध्ये एकमत होण्याबाबत महाविकास आघाडीचे नेते साशंक आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीतले नेते प्रकाश आंबेडकर स्वतंत्र लढल्यास त्याचा महाविकास आघाडीला किती फटका बसू शकतो याचा अंदाज घेऊ लागले आहेत. महाविकास आघाडीत शिवसेनेचा ठाकरे गट सर्वाधिक जागा मिळाव्या यासाठी प्रयत्न करत आहे. ठाकरे गटाला १८ पेक्षा अधिक जागा हव्या आहेत, अशा प्रकारची वक्तव्ये ठाकरे गटातील नेत्यांकडून ऐकायला मिळत आहेत. त्याचबरोबर शरद पवार गट आणि काँग्रेसलाही अधिकाधिक जागा हव्या आहेत. यावर वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, फुटलेल्या पक्षांनी आधी त्यांची ताकद पाहावी. आपली ताकद पाहूनच आघाडीत जागा मागाव्या. उद्या असं होऊ नये की, कोंबडी आम्ही शिजवली. त्यानंतर आम्हाला फक्त कोंबडीचं मुंडकं दिलं आणि उरलेली कोंबडी इतर लोक घेऊन गेले. आम्ही तसं होऊ देणार नाही. मी आमच्या लोकांना सांगितलं आहे, आपण शेवटच्या क्षणापर्यंत थांबू. मिळून मिसळून आणि सन्मानाने कोंबडी खाऊ. २ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबईतील ट्रायडंट हॉटेल येथे महाविकास आघाडीची बैठक पार पडली होती. या बैठकीत वंचित बहुजन आघाडीचा महाविकास आघाडीत समावेश करून घेण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं. या आघाडीला एक महिना उलटला तरी अद्याप चार पक्षांमध्ये ताळमेळ असल्याचं चित्र पाहायला मिळालं नाही. प्रकाश आंबेडकर अजूनही स्वबळावर लढण्याची भाषा बोलत आहेत. तर मविआ नेत्यांनी लोकसभेच्या जागांबाबत अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही.

# थकबाकी भरण्याचे महावितरणचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** परिमंडलातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक वर्गवारीतील ४ लाख ३१३ ग्राहकांकडे १९२ कोटी १८ लाख रुपयांचे वीजबिल थकीत आहे. त्यामुळे बिल वसुली अथवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करणे हे दोनच पर्याय वीज कर्मचाऱ्यांसमोर आहेत. ग्राहकांच्या सोयीसाठी मार्च महिन्यात शनिवार, रविवारसह सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्रे सुरू राहणार आहेत. संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी संबंधित वीज ग्राहकांनी थकबाकीचा भरणा करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.
थकबाकी वसुलीसाठी क्षेत्रीय अभियंते, तांत्रिक कर्मचाऱ्यांसमवेत विभाग, मंडल, परिमंडल कार्यालयातील अभियंते, अधिकारी व कर्मचारी वसुलीच्या कामात व्यग्र आहेत. वीजबिल भरण्याची मुदत संपलेल्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील ४ लाख ३१३ घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक ग्राहकांकडे १९२ कोटी १८ लाख रुपयांची थकबाकी वसूल होणे बाकी आहे. शहर मंडलातील १ लाख १८ हजार ५९१ ग्राहकांकडे ५२ कोटी ६५ लाख रुपयांची थकबाकी आहे. ग्रामीण मंडलातील १ लाख ६६ हजार ६६५ ग्राहकांकडे ४५ कोटी ३१ लाख रुपयांचे वीजबिल थकित आहे. जालना मंडलातील १ लाख १५ हजार ५७ ग्राहकांकडे ९४ कोटी २२ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याची कटू कारवाई व संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी ग्राहकांनी वीजबिल भरणे आवश्यक आहे.

वीजबिल भरणा सोयीचा व्हावा यासाठी या महिन्यात सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्रे सुरू ठेवण्यात आली आहेत. याशिवाय महावितरणची वेबसाइट, ग्राहकांसाठीचे मोबाईल अॅप, विविध पेमेंट वॉलेट आदींच्या माध्यमातून डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंगमार्फत वीजबिल ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सुविधांचा उपयोग करून संबंधित ग्राहकांनी थकबाकी व इतर ग्राहकांनी चालू वीजबिलाचा विहित मुदतीत भरणा करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# दांडपट्टा फिरवायला महायुती सरकार मागेपुढे पाहणार नाही : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विरोधकांना शेतकऱ्यांचं काही देणेघेणं नाही, काय दिले त्याचा हिशोब द्यायचा होता, आकडे आमच्याकडे आहेत. त्यामुळे शेतकरी कोमात आहे, अशा भाषा योग्य नाही, हा शेतकऱ्यांचा अपमान आहे. आम्ही शेतकऱ्यांचे अश्रू पुसले, तुम्ही तोंडाला पाने पुसली, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी शिंदे यांनी विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या मुद्यावरून चौफेर टीका होत असल्याने सरकारकडून घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले की, तुम्ही 50 हजार दिले नाही, आम्ही खात्यावर जमा केले, तुम्ही केवळ पोकळ घोषणा केल्या. आमचं काम भरीव आहे. त्यांनी सांगितले की, सरकार गेलं हे मान्य करायलाच तयार नाहीत. त्यामुळे वस्तुस्थिती मान्य करा. सरकार वेगाने काम करत आहे, कळतंय पण वळत नाही अशी स्थिती आहे. नागपूर अधिवेशन असताना मी व देवेंद्र फडणवीस स्वतः माती व चिखल तुडवत गेलो. शेतकऱ्यांना वर्क फ्रॉम होम करता येईल का? असे प्रश्न कुणी मांडले होते. त्यांना शेतकऱ्यांचे प्रश्न कळणार का? शेतकऱ्यांना योजना लागू केल्या आहेत. 29 हजार 520 कोटी रुपये शेतकऱ्यांचा खात्यात जमा केले आहेत. 12 हजार रुपये शेतकऱ्यांना सन्मान निधी वर्षाला मिळत आहेत. 88 लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत आहे. एकनाथ शिंदे बोलतो ते बोलतो, खोटं बोलत नाही, दिलेला शब्द पाळतो. इथं व केंद्रात आमचे सरकार आहे.डबल इंजिनमुळे शेतकऱ्यांना जबल आनंद मिळत आहे. शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी योजनांना चालना दिली आहे. शिंदे म्हणाले की, अडीच घर चाललेल्या आणि तिरकी चाल असलेल्या आधीच्या सरकारने सिंचन प्रकल्प बंद पाडले होते. आम्ही 131सिंचन प्रकल्पांना चालना दिली. चांगल्याला चांगलं म्हटलं पाहिजे. नाना (नाना पटोलेंना उद्देशून) तुम्ही खाजगीत सांगता की चांगल काम झालं. पक्ष चोरला हे रोज सुरु असून स्वार्थापायी विचार विकले याला काही अर्थ नाही. सारखं चोरलं म्हणण्यापेक्षा मर्दा प्रमाणे बोला की. खोके आम्हाला म्हणणारे त्यांनी खात्यातून 50 लाख रुपये चोरले.

# पोलचा अंदाज

आधुनिक केसरी

लोकसभा निवडणुकीसाठी सध्या सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरु केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून लवकरच निवडणुकांच्या तारखांची घोषणा होण्याची शक्यता आहे. यादरम्यान Zee News आणि MATRIZE चा ओपिनियन पोल समोर आला आहे. भाजपामध्ये अनेक नवे पक्ष सामील झाल्यानंतर आणि इंडिया आघाडीची स्थापना झाल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक असणार आहे. त्यामुळे देशात पुन्हा नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील सरकार येणार की इंडिया आघाडी धक्का देणार याकडे देशवासीयांचे लक्ष आहे. दरम्यान या ओपिनियम पोलमध्ये महाराष्ट्राबद्दल काय अंदाज वर्तवण्यात आला आहे हे जाणून घेऊया. या ओपिनियन पोलनुसार आजच्या घडीला लोकसभा निवडणूक झाल्यास महाराष्ट्रात एनडीएला म्हणजेच भाजपा, शिंदे गट, अजित पवार गटाला 48 पैकी 45 जागा मिळतील. तर महाविकास आघाडीला फक्त 3 जागा मिळतील असा अंदाज आहे. मागील लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत एनडीएच्या जागांमध्ये 7 आणि मतांमध्ये 4.6 टक्क्यांची वाढ होईल. तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या जागा 6 ने कमी होतील आणि मतांमध्ये 4.1 टक्क्यांची घट होईल. अजित पवार गट एनडीएत सहभागी झाल्याचा लोकसभा निवडणुकीवर किती परिणाम होईल असे विचारण्यात आले असता 28 टक्के लोकांना फार तर 32 टक्के लोकांना काही प्रमाणात असे मत नोंदवले आहे. तर 22 टक्के लोकांनी नुकसान होईल असे म्हटले आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामकाजावर तुमचे मत काय असे विचारण्यात आले असता 36 टक्के लोकांनी आपण काही प्रमाणात संतृष्ट असून, कामकाज ठिकठाक असल्याचे म्हटले आहे. तर 32 टक्के लोकांना कामकाज चांगलं असून, फार समाधानी असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. तर 26 टक्के लोकांनी अजिबात सहमत नसल्याचे मत नोंदवले आहे. तसेच एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून सर्वात चांगले काम केल्याची पावती देण्यात आली आहे. 44 टक्के मते एकनाथ शिंदे, 36 टक्के मते देवेंद्र फडणवीस आणि 20 टक्के मते उद्धव ठाकरेंना मिळाली आहेत. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने झी मीडिया आणि मॅट्रिझने ओपिनियन पोल केला आहे. दोन्ही आघाडी स्थापन झाल्यानंतर आणि राज्यसभा निवडणुकीनंतर ही जनमत चाचणी घेण्यात आली आहे. हे सर्वेक्षण 5 फेब्रुवारी ते 27 फेब्रुवारी दरम्यान घेण्यात आले आहे. या ओपिनियन पोलमध्ये लोकसभेच्या 543 जागांवर 1 लाख 67 हजार 843 लोकांची मते घेण्यात आली. ज्यामध्ये 87 हजार पुरुष आणि 54 हजार महिलांचा समावेश आहे. याशिवाय या ओपिनियन पोलमध्ये 27 हजार नवमतदारांची मतंही समाविष्ट करण्यात आली आहेत. ओपिनियन पोलच्या निकालांमध्ये एक ते दोन टक्क्यांचा फरक पडू शकतो. हे निवडणुकीचे निकाल नाहीत, हा फक्त ओपिनियन पोल आहे. हा ओपिनियन पोल म्हणजे कोणत्याही प्रकारे निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न नाही.

# पुणे लोकसभा २०२४ : कोण मारणार बाजी ?



सागर ननावरे, पुणे
प्रख्यात स्तंभलेखक

आधुनिक केसरी

**विद्येचे माहेरघर त्यानंतर आयटी हब,मेट्रो सिटी, स्मार्ट सिटी अशा विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या पुण्याच्या राजकारणाला देशाच्या राजकारणात विशेष महत्त्व आहे.सांस्कृतिक,शैक्षणिक शहर अशी ओळख असणाऱ्या पुण्याने पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय शहर म्हणून देखील आघाडी घेतलेली आहे. पुण्यातील राजकीय घडामोडींची नेहमीच चर्चा होत असते. आता चर्चा आहे ती उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुकीची. लोकसभा निवडणुकीचा काउंट डाऊन एव्हाना सुरू झाला आहे. 18 व्या लोकसभेसाठी राजकीय पक्ष सज्ज झालेले आहेत. लोकसभा निवडणुकीचे पडघम सर्वत्र वाजू लागले आहेत.**




पुण्यात देखील गल्लोगल्ली राजकीय चर्चा रंगू लागल्या आहेत. तसे पाहता पुणे लोकसभा मतदारसंघ हा राज्याच्या राजकारणात नेहमीच चर्चेचा विषय ठरलेला आहे. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळख असणारा पुणे लोकसभा मतदारसंघ भाजपने ताब्यात घेतला आणि तिथूनच खऱ्या अर्थाने पुण्याच्या राजकीय पटलावर अनेक घडामोडी घडू लागल्या. लोकसभा निवडणुकीतील पुणे मतदासंघाचा इतिहास हा महत्वपूर्ण राहिलेला आहे.

पुणे मतदारसंघ हा पूर्वीपासूनच काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेला आहे. 1952 पासून आजतागायत तब्बल 10 वेळा खासदार निवडून आणण्यात काँग्रेस पक्षाला यश आले आहे. तर 1991 मध्ये भाजपने काँग्रेसच्या वर्चस्वाला आव्हान दिलं. आणि या मतदारसंघातून अण्णा जोशी हे भाजपचे पहिलेच खासदार म्हणून निवडून आले होते.परंतु पुढील पंचवार्षिकला हेच ठेवण्यात भाजपला अपयश आले. त्यानंतर 'सबसे बडा खिलाडी, सुरेश कलमाडी' या वलयाला प्रारंभ झाला. त्याकाळात पुण्यातील राजकारण सुरेश कलमाडी या व्यक्तीभोवती फिरत होत. कलमाडी म्हणजे पुणे आणि पुणे म्हणजेच कलमाडी अशी पुण्याची ओळख पडली होती.

1996 साली माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी पहिल्यांदा काँग्रेसच्या तिकिटावरून पहिल्यांदा खासदार झाले. त्यानंतर अनेक वर्षे सुरेश कलमाडी यांचे या मतदारसंघावर विशेष वर्चस्व होते. पण कॉमनवेल्थ स्पर्धेतला घोटाळा बाहेर आल्यावर राजकीय मैदानात कलमाडी हे क्लिनबोल्ड झाले. त्यानंतर येणारी निवडणूक पुण्यासाठी आणि काँग्रेससाठी आव्हानात्मक बनली होती. यातच 2014 मध्ये देशभरात आलेल्या मोदी लाटेने काँग्रेसच्या सिंहासनाला सुरुंग लावला. आणि तिथूनच पुणे शहरात भारतीय जनता पार्टी ची पाळेमुळे अधिक घट्ट रोवली गेली. 2014 च्या मोदी लाटेत अनिल शिरोळे यांनी तर त्यानंतर गिरीश बापट यांनी हा गड लढवला आणि जिंकला देखील.पुणे लोकसभा मतदारसंघाची फेररचना झाल्यानंतर पुण्यात भाजपची ताकद निश्चितच वाढली. दोन्ही लोकसभा निवडणुका,त्यानंतरच्या विधानसभा निवडणुका आणि महानगरपालिका निवडणुकीत देखील भाजपने बाजी मारली. यंदाची लोकसभा निवडणूक ही महाराष्ट्रातील राजकीय भूकंपानंतरची पहिलीच लोकसभा निवडणूक असल्याने याला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे साहजिकच पुण्यातील लढत ही तितकीच उत्कंठावर्धक आणि चुरशीची होणार यात शंका नाही. राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटी नंतर राजकीय समीकरणे बदलली आहेत. यंदा पुणे लोकसभा निवडणूक ही महाविकास आघाडी आणि महायुतीत होणार असली तरी, पुन्हा एकदा भाजप आणि काँग्रेसच आमनेसामने येणार असल्याचे सध्या तरी चित्र आहे. यात वंचित बहुजन आघाडी आणि मनसेसारख्या पक्षांच्या भूमिकेलाही विशेष महत्व असणार आहे. पुण्याच्या 2014 आणि 2019 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने ज्या मताधिक्याने काँग्रेसचा पराभव केला आहे ते पाहता भाजपचा एकछत्री अंमल चालू झाल्याचे बोलले जात होते. परंतु पुण्यातील मतदारांनी वेळोवेळी आपला कल बदलल्याचे दिसून आले आहे. याचाच परिणाम म्हणजे 2019 च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला पुण्यातील दोन विधानसभेच्या जागांवर अनपेक्षित पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर अतिशय प्रतिष्ठेच्या ठरलेल्या कसबा मतदारसंघ पोटनिवडणुकीत काँग्रेसने भाजपचा बालेकिल्ल्यातच पराभव करत कार्यकर्त्यांच्या आशा वाढवल्या आहेत. परंतु भाजपची पुणे लोकसभा मतदारसंघावर असलेली पकड ही तितकीच मजबूत असल्याने त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

यंदाच्या निवडणुकीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यात झालेली बंडखोरी निश्चितच मतदारांवर प्रभाव टाकणारी आहे. आणि त्यामुळेच मतदारांचा कल कोणाकडे आहे यावरच या दोन्ही राजकीय पक्षांची गणिते अवलंबून असणार आहेत. मागील दशकभरात शिवसेनेचे पुण्यामध्ये म्हणावे तेवढे निर्णायक वर्चस्व दिसून आले नाही. त्यानंतर झालेल्या फुटीनंतर शिवसेनेची मते विभाजित झालेली आहेत. त्यामुळे आगामी लोकसभा त्यांचा निवडणुकीत किती परिणाम होईल हे आजघडीला सांगता येणार नाही. परंतु पुणे शहर आणि उपनगरांमध्ये विशेष ताकद असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटी नंतर मात्र राजकीय अंदाज बांधणे कठीण झाले आहे.

तसे पाहता कसबा पोटनिवडणुकीत भाजपला पराभूत करणाऱ्या काँग्रेसच्या आशा वाढलेल्या होत्या. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाची साथ मिळाल्याने पुन्हा एकदा भाजप भक्कम स्थितीत आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

अजून लोकसभेचा बिगुल वाजलेला नाही. त्यामुळे आता लगेच तर्कवितर्क लावण्याला काहीही अर्थ नाही. त्यामुळे कोणत्या पक्षाच्या वतीने कोणता उमेदवार दिला जातो यावर देखील पुणे लोकसभा मतदारसंघाचे भवितव्य अवलंबून असणार आहे. शेवटी राजकीय भूकंप, सहानुभूती आणि बदललेली गणिते यांचा सर्वसामान्य मतदारांवर झालेला प्रभाव हाच या निवडणुकीत निर्णायक ठरणार हे मात्र नक्की.

# बाह्य जगताशी संबंध तोडणारा 'इअरफोन'



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**'मोबाईल' फोन जसा दिवसागणिक 'स्मार्ट' बनतो आहे, तशा 'मोबाईल'ला पूरक असलेल्या जोडवस्तूही 'स्मार्ट' बनू लागल्या आहेत. कालपरत्वे 'लॅण्डलाईन'चा जमाना जाऊन जसा बिनतारी 'मोबाईल' वापरात आला तसा 'इअरफोन'ही सध्या आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहे, कारण त्याला मात देण्यासाठी गेल्या ५-६ वर्षांपासून बाजारात 'ब्लूटूथ' आणि 'इअरबड्स'चे आगमन झाले आहे. 'ब्लूटूथ' आणि 'इअरबड्स'मुळे हात मोकळे राहतात शिवाय ते हाताळणे सोयीचे असले, तरी आवाजाच्या गुणवत्तेसाठी आजही अनेक जण 'इअरफोन'ला अधिक पसंती देताना दिसतात. खिशातील 'मोबाईल'ला 'इअरफोन'ची वायर जोडून ती कपड्याबाहेर कुणालाही न दिसता 'इअरफोन' कानाला लावणे ही सुद्धा एक वेगळी कला आहे.**

रस्त्याने चालताना, बस-ट्रेनने प्रवास करताना गळ्यात 'ब्लूटूथ', कानाला 'इअरफोन' किंवा 'इअरबड्स' नाहीत असा तरुण किंवा तरुणी सध्याच्या दिवसांत सापडणे विरळच झाले आहे. एकदा 'मोबाईल'वर गाणी लावून 'इअरफोन' कानाला लावला कि यामंडळींचा बाह्य जगाशी संबंध जवळपास संपुष्टात येतो. कानाने गाणी ऐकत ही मंडळी आपल्याच धुंदीत चाललेली असतात. आजूबाजूला काय घडते आहे याच्याशी त्यांचा काहीही संबंध नसतो. रस्त्यावरून चालताना एखाद्या वाहनाने जवळ येऊन जोराने 'हॉर्न' दिल्याशिवाय यांची एकाग्रता भंग पावत नाही. सार्वजनिक वाहनांनी प्रवास करताना शेजारी कोण बसले आहे, त्यांच्याशी संवाद करणे तर दूर शेजारी बसलेला पुरुष आहे कि स्त्री यांचेही यांना कधी कधी भान नसते. काही महाभाग तर घरीसुद्धा 'इअरफोन'वर किंवा 'ब्लूटूथ'वर गाणी ऐकण्यात तासनतास घालवतात. घरी येणाऱ्या पाहुण्यांशी, घरातील नातेवाईकांशी संवाद साधनेही यांना नकोसे वाटत असते. सातत्याने गाणी ऐकण्यात व्यग्र असल्याने अशांच्या ज्ञानाच्या कक्षा खुंटतात, मनोविकार जडतात. प्रवासात बाहेरील निसर्गाचा आनंद घेणे, इतरांशी संवाद साधून त्यांच्याशी आपले अनुभव 'शेअर' करणे, त्यांच्याकडून अधिक माहिती जाणून घेणे या गोष्टी यांना कंटाळवाण्या वाटू लागतात. कानाला सातत्याने 'इअरफोन' लावणाऱ्यांचा स्वभाव सुद्धा एकलकोंडा बनतो. मोटार वाहन कायद्यानुसार वाहन चालवताना 'मोबाईल'वर बोलणे दंडात्मक गुन्हा आहे. कानाला 'इअरफोन' लावून बोलणेही या कक्षेत येते. सध्या बाजारात मिळणारे 'इअरबड्स' इतके लहान असतात कि ते वाहनचालकाने लावले असल्याचे अगदी जवळून पाहिल्यावाचून कळतही नाही. त्यामुळे रस्त्यावरील पोलीस हवालदारांपासून बचाव होत असला, तरी वाहन चालवताना फोनवर बोलल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता कमी होत नाही. सध्या बाजारात मिळणारे 'इअरफोन' अगदी ५० रुपयांपासून सहज उपलब्ध होतात. 'ब्लूटूथ' आणि 'इअरबड्स' रस्त्यावर २०० ते ३०० रुपयांना मिळतात. त्यामुळे अनेक जण ते सहज खरेदी करतात. कानासारख्या नाजूक अवयवांना बराच वेळ स्पर्श करणारे हे हलक्या दर्जाचे 'इअरफोन' आणि 'इअरबड्स' आरोग्याच्या दृष्टीने किती सुरक्षित आहेत याचा आपण विचार करतो का ?सातत्याने 'इअरफोन' वापरल्याने कानाच्या पडद्यावर गंभीर परिणाम होतो. प्रत्येकाच्या कानाची ऐकण्याची क्षमता साधारणतः ९० डेसिबल्ब एव्हढी असते. 'इअरफोन'च्या अतिवापरामुळे ती ४० ते ५० डेसीबल्बपर्यंत कमी होऊ शकते. 'इअरफोन' अथवा हेडफोन लावून तासनतास गाणे ऐकणे कानांसाठी आणि हृदयासाठी अत्यंत घातक असते. 'इअरफोन'वर सतत गाणी ऐकल्याने हृदयाची धडधड वेगाने होते, ज्यामुळे हृदयविकार उफाळण्याची शक्यता असते. 'इअरफोन'मधून प्रक्षेपित होणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरींचा मेंदूवर विपरीत परिणाम होतो. ज्यामुळे तीव्र डोकेदुखी आणि मायग्रेनची समस्या निर्माण होऊ शकते. 'इअरफोन'च्या अतिवापरामुळे निद्रानाश आणि स्लीप ॲपनियाचा त्रासही होऊ शकतो. 'इअरफोन' किंवा 'इअरबड्स' कानाच्या पडद्याला चिकटून लावले जातात. बराच वेळ ते लावून राहिल्यास कानाच्या पडद्यायंत हवा पोहोचत नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandare. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



छत्रपती संभाजीनगरमधील गजानन महाराज मंदिरावर दिव्यांची रोषणाई करण्यात आली आहे... गजानन महाराजांच्या प्रगट दिनाच्या उत्सवाच्या माध्यमातून ही सुंदर रोषणाई केली आहे...! छायाचित्र : सुधीर कोर्टीकर

# धावण्याच्या सरावादरम्यान पोलिसाचा हृदयविकाराने मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** पहाटे धावण्याच्या सरावासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना शहरातील गोदणी मार्गावर असलेल्या ऑक्सीजन पार्क परिसरात गुरुवारी सकाळी घडली. अभिषेक दशरथ आडे (२७, रा. पोलीस मित्र सोसायटी, यवतमाळ) असे मृत पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

अभिषेक यांचा पोलीस उपनिरीक्षक पदासाठी अभ्यास सुरू होता. शहरातील दारव्हा मार्गावरील पोलीस मित्र सोसायटीत अभिषेक आडे कुटूंबीयांसह राहत होते. गेल्या सात वर्षापूर्वी अभिषेक यांचे वडील दशरथ आडे यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला होता. तेव्हा ते शहर पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांच्या मृत्यूनंतर गेल्या चार वर्षापूर्वी अभिषेक हे अनुकंपात पोलीस शिपाई म्हणून रूजू झाले होते. अभिषेक अंगुली मुद्रा शाखेत कार्यरत होते. अभिषेक पोलीस उपनिरीक्षक पदासाठी तयारी करीत असल्याने नेहमीप्रमाणे मित्रांसह गुरूवारी पहाटे शहरातील गोदणी मार्गावर असलेल्या ऑक्सीजनपार्कमध्ये धावण्याच्या सरावासाठी गेले होते. यावेळी अचानक त्यांच्या छातीत दुखायला लागल्याने मित्रांनी त्यांना तातडीने एका खाजगी रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.त्यानंतर अभिषेक यांचा मृतदेह जिल्हा शासकीय रूग्णालयात उत्तरीय तपासणीकरीता पाठविण्यात आला. अभिषेक यांच्या मागे आई आणि एक लहान भाऊ आहे. या घटनेने पोलीस वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे.

# शासकीय निधी मिळत नसल्याने आक्रोश मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** दलित वस्ती घरकुल रेशन कार्ड संजय गांधी निराधार योजना त्याबरोबरच जिल्हा सहकारी बँकेतून ४० कोटी रुपये कर्ज गणेश कारखान्याचे प्रलंबित ठेवले असुन शासकीय निधी मिळत नाही अशा विविध कारणावरून पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे यांच्या विरोधात युवा नेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली राहता कोपरगाव तालुक्यातील ग्रामपंचायत सहकारी सोसायटी विविध पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा आक्रोश मोर्चा नुकताच शिर्डी येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला होता

याप्रसंगी विवेक कोल्हे म्हणाले की दहा वर्षापासून आम्ही भाजपच्या माध्यमातून काम करत असुन पक्ष मजबूत करण्यासाठी योगदान दिले आहे आता किरकोळ कामे होत नसल्याने जनतेत जाऊन पक्षासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी कशी मते मागायची किरकोळ असलेल्या रेशन कार्ड संजय गांधी घरकुल असे कामे देखील होत नाही दलित वस्तीसाठी असलेला केंद्र सरकारचा निधी देखील मिळत नाही प्रतिस्पर्ध्याला संपवण्यासाठी प्रयत्न सुरू आहे ५० हून ग्रामपंचायतींना दलित वस्तीचा निधी देखील मिळालेले नाही हे पहिल्यांदाच घडले आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोलापुर येथे घरकुलांचे लोकार्पण झाले येसगाव येथे घरकुलांचे काम सुरू आहे ५० घरकुलांची वस्ती होणार असून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त हे गाव आहे आदिवासी सरपंच असताना निधी रखडून ठेवला आहे ज्या नगर जिल्हा सहकारी बँकेवर सत्तांतर करून भाजपचे चेअरमन बसवण्यासाठी आम्ही योगदान दिले त्याच बँकेत गणेश कारखान्याचे ४० कर्ज कोटीचे कर्ज प्रकरण अडकून ठेवले असून त्यामुळे शेतकऱ्यांचे पैसे देखील प्रलंबित राहिलेले आहे हा त्यासाठी जनतेचा आक्रोश आहे न्याय मिळावा यासाठी आपण आज मोर्चा काढला असल्याचे त्यांनी सांगितले हे पक्षाच्या विरोधात आंदोलन नसून विखे जनता पार्टीचे विरोधात भारतीय जनता पार्टीने काढलेला हा आक्रोश मोर्चा आहे आमदार आशुतोष काळे यांनी मौन पकडले असून त्यांचा देखील आपण निषेध करतो लोक जेव्हा अपेक्षां म्हणून जवळ येतात तेव्हा आपण त्यांना न्याय देण्यासाठी वेळप्रसंगी संकुचित प्रवृत्तीच्या विरोधात वेळ आली तर त्या विरोधात नेतृत्व देखील करू असे सांगत भविष्यात निवडणुकीत उभे राहण्याचे संकेत त्यांनी दिले आहे यावेळी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते उपस्थित होते.




# पोलिओ लसीकरण मोहीम होणार प्रभावी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यामध्ये सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत "राष्ट्रीस पल्स पोलिओ लसीकरण मोहिम" 3 मार्च 2024 पासून राज्यात सर्वत्र आयोजित होणार आहे यावेळी 0 ते 5 वर्षेवयोगटातील मुलांमुलींना या लसीची मात्रा सर्वत्र दिली जाणार आहे. आपल्या देशातून / राज्यातून पोलिओ रोगाचे समुळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने सन 1995-96 पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येत आहे. मागील 13 वर्षापासून भारतात एकही पोलिओची केस आढळलेली नाही. त्यामुळे मार्च 2024 मध्ये भारतातुन पोलिओचे समुळ उच्चाटन झाल्याचे जागतिक आरोग्य संघटनेचे प्रमाणपत्र राष्ट्रीय स्तरावर प्राप्त आहे.



प्राप्त जिल्हयात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम अंतर्गत दिनांक 03 मार्च 2024 रोजी राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हयात ग्रामीण भागात 1 हजार 218 व शहरी भागात 123 असे एकुण 1 हजार 341 लसीकरण केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. जिल्हयात 44 प्राथमिक आरोग्य केंद्र, 1 स्त्री रुग्णालय, 1 जिल्हा रुग्णालय, 1 शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व 1 शासकिय आयुर्वेद महाविद्यालय कार्यान्वीत आहे. या राष्ट्रीय मोहिमे अंतर्गत 5 वर्षाच्या आतील अपेक्षित 1 लाख 69 हजार 870 बालकांना त्यांच्या पूर्वीच्या लसीकरण स्थितीचा विचार न करता (नविन जन्म झालेल्या किंवा बाळ आजारी असेल तर वैद्यकिय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार ) पोलिओ लसीच्या मात्रा देण्यात येणार आहेत.

जिल्हयातील 1 लाख 69 हजार 870 ग्रामीण भागातील 1 लाख 42 हजार 107 आणि शहरी 27 हजार 763 अपेक्षित लाभार्थी संख्या असुन धाराशिव जिल्हयात एकुण 8 तालुके आहेत. तर एकुण वाडयावस्त्या 805 त्यात गावे 735, तर वाड्यावस्त्या 70 आहेत.

जिल्हयात एकुण लसीकरण केंद्र 1 हजार 341 त्यापैकी शहरी 123, तर ग्रामीण 1 हजार 218 एवढे आहेत. बूथ वरील कार्यरत कर्मचारी 3 हजार 317 यामध्ये आरोग्य कर्मचारी 482, आरोग्य पर्यवेक्षक 190, अंगणवाडी कार्यकर्ती 1 हजार 804, अंगणवाडी मदतनीस 1 हजार 765, तर आशा 1 हजार 207, पर्यवेक्षक 260 (ग्रामीण- 238, शहरी - 22) वैद्यकिय अधिकारी 123 ( ग्रामीण - 103, शहरी - 20) एवढी यंत्रणा कार्यरत आहे.

या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मध्ये समाजाचा सहभाग मिळवण्यासाठी जिल्हास्तरावरुन नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक वार्ड / गाव / वस्ती / तांडा येथे म्हणी, पोस्टर्स, स्टीकर्स व मायकिंग द्वारे जनजागृती करण्यात येत आहे. आणि मोहिमेच्या आदल्यादिवशी म्हणजेच दिनांक 2 मार्च 2024 रोजी ग्रामीण व शहरी भागातील शालेय विद्यार्थ्यांमार्फत प्रभातफेरी जनजागृती करीता काढण्यात यावी.

तसेच बूथ वरील म्हणजेच 3 मार्च 2024 रोजी होणाऱ्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिम कार्यक्रमासाठी तसेच त्यानंतर 3 व 5 दिवस घर भेटीद्वारे राहिलेल्या बालकांना लस देण्यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचे नियोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व नागरिकांनी आपापल्या 0 ते ५ वर्षे वयोगटातील मुलामुलींना बाळ नुकतेच जन्माला आले असले तरी, बाळ आजारी असले तरी कुण्या पाहुण्याचे बाळ घरी आले असले तरी, नियमित लसीकरणात डोस दिला असला तरी, सर्वांनी या मोहिमे दिवशी पोलिओची मात्रा आपल्या बालकांना दयावी. ही पोलिओ ची मात्रा तोंडावाटे फक्त दोन थेंब देण्यात येते ही लस सुरक्षित असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतिश हरिदास यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

# शालेय बसला अपघात, चार विद्यार्थी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहरातील पाथर्डी-वडनेर रस्त्यावर शालेय विद्यार्थी वाहतुकीच्या बस अपघातात चार विद्यार्थी जखमी झाले. दुसऱ्या मोटारीचे टायर फुटून हा अपघात झाल्याचे स्थानिकांकडून सांगितले जाते. शालेय बस थेट रस्ता सोडून लगतच्या शेतात गेली. इर्स्पॅलियर स्कूलची ही बस असून इयत्ता चवथी व दुसरीत शिक्षण घेणारे हे विद्यार्थी आहेत. अपघातावेळी मोठा आवाज झाल्याने स्थानिकांनी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले. गुरुवारी दुपारी साडेतीन ते चार या वेळेत हा अपघात झाला. शाळा सुटल्यानंतर चालक विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी निघाला होता. वाटेत काही विद्यार्थ्यांना सोडल्यानंतर चार विद्यार्थ्यांना घेऊन बस पाथर्डी, वडनेरच्या दिशेने निघाली होती. त्यावेळी भरधाव येणाऱ्या मोटारीचे टायर फुटल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जाते. अकस्मात टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि ती समोरून येणाऱ्या बसकडे गेली. यावेळी रस्त्याच्या कडेला जाण्याच्या प्रयत्नात बस रस्त्यावरून उतरून शेतात गेली. अपघातात मोटार चालक जखमी झाला. तर बसमधील चार विद्यार्थ्यांना डोक्याला, तोंडाला किरकोळ जखमा झाल्या. स्वराज वाघमारे, ईश्वरी निमसे, आयुरा जोशी व सिग्ना चव्हाण अशी या विद्यार्थ्यांची नावे असल्याचे शाळेकडून सांगण्यात आले. अपघातावेळी मोठा आवाज झाल्याने स्थानिकांनी धाव घेतली. याच वेळी माजी गृहमंत्री अनिल देशमुख या मार्गावरून जात होते. त्यांनी थांबून मदतीसंदर्भात सूचना केल्या. घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, बसमधील चारही विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांचे अहवाल व प्रकृती सामान्य असल्याचे शाळेचे संचालक सचिन जोशी यांनी सांगितले. बस चालक सुरेश साळवे यांनी प्रसंगावधान राखल्याने विद्यार्थ्यांना कुठलीही इजा झाली नसल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणी मोटार चालकाविरुध्द इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते.

# महिला आयोगाच्या सदस्याकडूनच रुपाली चाकणकरांवर गंभीर आरोप

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** रूपाली चाकणकर या महिला आयोगाच्या अध्यक्ष असल्या तरी त्यांच्या दरबारात महिलांना न्याय मिळत नसल्याचा आरोप महिला आयोगाच्या सदस्याच संगीता चव्हाण यांनी केला आहे. चव्हाण यांनी रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी त्यांनी केली आहे. विशेष म्हणजे गडचिरोलीमधील वन विभागात असलेल्या एका प्रकरणात संबंधित महिलेला महिला आयोगाच्या कार्यालयातून हाकलून लावण्यात आले. त्या महिलेने आतापर्यंत महिला आयोगाकडे न्याय मागण्यासाठी किती वेळा अर्ज आणि विनवणी केली, याचे पुरावे संगीता चव्हाण यांनी दाखवले आहेत. महाविकास आघाडीचे सरकार असताना महिला आयोगाच्या माध्यमातून अनेक महिलांना न्याय मिळाला. मात्र रूपाली चाकणकर या फक्त आता आपल्या पक्षाचे काम करत असून महिलांना न्याय मिळत नसल्याचे आरोप संगीता चव्हाण यांनी केले आहेत. तर दुसरीकडे फक्त गडचिरोली येथील प्रकरणच नाही तर राज्यातील वेगवेगळ्या भागातील महिला देखील महिला आयोगात तक्रारी करतात. मात्र, त्यांना कुठल्याच प्रकारची मदत किंवा न्याय मिळत नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी महिला आयोग बरखास्त करावा आणि रूपाली चाकणकर यांना पदावरून पाठवण्याची मागणी संगीता चव्हाण यांनी केली आहे. संगीता चव्हाण या महिला आयोगाच्या सदस्य आहेत. तर बीड मधील उद्धव ठाकरे गटाच्या त्या शिवसेनेच्या पदाधिकारी देखील आहेत. गेल्या काही दिवसांपासून रूपाली चाकणकर या महिलांच्या तक्रारी जाणून घेत नसल्याने माझ्याकडे अनेक महिला तक्रारी घेऊन येत असल्याचं संगीता चव्हाण यांनी सांगितले. महिला आयोगाची भूमिका महिलांना न्याय देण्याची नसेल तर रूपाली चाकणकर यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे संगीता चव्हाण यांनी म्हटले. काही महिन्यांपूर्वी सोशल मीडियावर रुपाली चाकणकर यांच्याविषयीचा अश्लील मजकूर व्हायरल झाला होता. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असणाऱ्या महिलेला अशाप्रकारच्या अनुभवाचा सामना करायला लागल्यामुळे एकच खळबळ उडाली होती.



# लोकेश वसगडेकर ठरला मोहिनीराज चषकाचा मानकरी

## बेस्ट पोझर धीरज सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** श्री मोहिनीराजांच्या यात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित जिल्हा स्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या स्पर्धेत शिर्डीचा लोकेश वसगडेकर मोहिनीराज चषक २०२४ चा मानकरी ठरला तर श्रीरामपूर येथील धीरज सोनवणे याने बेस्ट पोझर चा 'किताब पटकावला.

ग्राम दैवत श्री मोहिनीराज महाराज यात्रोत्सव  निमित्त नेवासा येथे  भव्य अशा जिल्हा स्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या सदर स्पर्धेत जिल्ह्यातील विविध भागातील १०७ स्पर्धक सहभागी झाले होते,दि.२८ फेब्रुवारी रोजी नेवासा बुद्रुक येथील रामलीला लॉनवर सायंकाळी झालेल्या जिल्हा स्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे

**५५ किलो गट-प्रथम क्रमांक रवींद्र सूर्यवंशी कोपरगाव**
द्वितीय क्रमांक आसिफ शेख नगर
तृतीय क्रमांक अशांत जाधव नगर
चतुर्थ क्रमांक प्रथमेश कटके कोपरगाव
पाचवा क्रमांक श्रीकांत जाधव कोपरगाव

**६० किलो गट-प्रथम क्रमांक**
नवनाथ कुऱ्हे कोपरगाव दुसरा क्रमांक ललित घुले शिर्डी तिसरा क्रमांक विजय घोरपडे कोपरगाव चौथा क्रमांक निलेश मस्के नेवासा पाचवा क्रमांक अजय बोरुडे नगर

**६५ किलो वजनी गट विजेते**
धीरज सोनवणे श्रीरामपूर प्रथम क्रमांक
ओमकार पडीकर नगर दुसरा क्रमांक
सखाहरी बर्डे राहुरी तिसरा क्रमांक
प्रीतम भिसे केडगाव चौथा क्रमांक
आकाश भोसले कोपरगाव पाचवा क्रमांक

**७० किलो वजन गटातील गट** विजेते
अक्षय गलांडे संगमनेर प्रथम क्रमांक
वाहीद पठाण नगर दुसरा क्रमांक
अक्षय चव्हाण नगर तिसरा क्रमांक
राहुल जगताप शिर्डी चौथा क्रमांक
सुजित गागंड राहुरी पाचवा क्रमांक

**७५  किलो वजन गटातील गट** विजेते
लोकेश वसगडेकर शिर्डी प्रथम क्रमांक
अभिषेक पठाडे संगमनेर दुसरा क्रमांक
दीपक गोरडे श्रीरामपूर तिसरा क्रमांक
फिरोज पठाण नगर चौथा क्रमांक
वाजीत शेख संगमनेर पाचवा क्रमांक

स्पर्धेसाठी पंच म्हणून जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे मयूर दरंदले कैलास रणसिंग सतीश रासकर,प्रतीक पाटील डेव्हिड मकासरे, राहुल कुलकर्णी यांनी काम पाहिले स्टेज मार्शल म्हणून शब्बीर सय्यद भीमा चव्हाण किरण पोटे निखिल कोटकर यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष मयूर दरंदले,प्र मोद मारकळी, मनोज वाघ, प्रताप हांडे सौरव मूनोत, विकी खाराडकर,जयदीप जामदार,यांनी अथक परिश्रम घेतले.
तर संजय सुखदान यांनी वयक्तिक बक्षिसे देऊन स्पर्धकांना प्रोत्साहित केले या  स्पर्धेत जिल्ह्यातील एकूण १०७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता या सर्वांचे जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष मयूर दरंदले यांनी आभार मानले.

# विषय समिती सभापतीपदी सोनीताई कदम; महिला, बालकल्याण समितीपदी ज्योती बोरसे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा परिषदेच्या विषय समिती सभापतीपदी सोनीताई पंकज कदम यांची निवड करण्यात आली तर ज्योती देविदास बोरसे यांची महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी निवड करण्यात आली ही निवड बिनविरोध झाली असून पीठासन अधिकारी राहुल जाधव आणि सहाय्यक विकासासाठी भाऊसाहेब अकलाडे यांनी जाहीर केली समिती सभापती निवडीसाठी शुक्रवार दिनांक एक मार्च रोजी धुळे जिल्हा परिषदेच्या कैलासवासी यशवंतराव चव्हाण सभागृहात निवडणूक प्रक्रिया पार पडली समिती सभापती पदांची निवड जाहीर होतात नवनिर्वाचित सभापती सोनीताई पंकज कदम व ज्योती देविदास बोरसे यांच्या समर्थकांनी जिल्हा परिषद आवारात गुलाल उधळून ढोल ताशाच्या गजरात आनंदोत्सव साजरा केला नवनिर्वाचित सभापतींवर अभिनंदन याचा वर्षाव करण्यात आला विविध मान्यवरांनी नवनिर्वाचित सभापतींना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला दोन्हीही नवनिर्वाचित सभापतींनी जिल्हा परिषद आवारातील महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले.



# सोयगाव येथे संगीतमय शिवमहापुराण

## कथा व रुद्राक्ष महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात येथे संगीतमय शिवमहापुराण कथा, संकीर्तन सप्ताहाचे आयोजन दि.२/३/२४ ते ८/३/२४ मार्च पर्यंत आयोजन करण्यात आले आहे सोयगाव पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन भैरवनाथ मंदिर संस्थानच्या वतीने  केले आहे. भैरवनाथ मदीराचे सदस्य नेहमीच समाज प्रबोधन, सामाजिक कार्य असो की धार्मिककार्यअसो प्रत्येक कार्यात निस्वार्थपणे, हिरीरीने भाग घेऊन ते कार्य यशस्वीपणे पार पाडत असतात. अनेक धार्मिक उपक्रम यशस्वी करून दाखविले आहेत. समाज प्रबोधन करणेसाठी ह.भ.प.नाईकदादा महाराज यांच्या आशीर्वादाने भव्य संगीतमय श्री शिवमहापुराण कथा रुद्राक्ष महोत्सवाचे भैरवनाथ मंदिर सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे आयोजन करण्यात आले आहे. यांच्या प्रेरणेतुन बऱ्याच वर्षापासून कथा व किर्तन सप्ताहाचे आयोजन सुरु केलेले आहे.या वर्षी प्रसिद्ध शिवमहापुराण कथा प्रवक्ते व -प्रसिद्ध व नावाजलेले किर्तनकार ह.भ.प.अनिलजी महाराज तुपे व ह.भ.प.जयश्रीताई  यांच्या मधूर वाणीतून सप्ताहाचे आयोजन दि.२ मार्च ते ८ मार्चच्या दरम्यान भैरवनाथ मंदिर स्थळाजवळ करण्यात आलेले आहे. ह.भ.प.अनिलजी महाराज नाशिककर येथील स्वरगंधर्व तथा महाशिवपुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. अनिल - महाराज तुपे हे आपल्या "अमृत वाणीतून संगितमय महाशिवपुराण कथा वाचन" दररोज दुपारी-११ ते ३ दरम्यान करणार आहेत. सप्ताहात दैनंदिन काकडा सकाळी- ५ ते ६शिवमहापुराण कथा-११  ते ३, हरिपाठ-५-३० ते ६-३०, व दररोज रात्री हरि किर्तन- ८-३० ते १०-३० या वेळेत होणार आहे. त्या मध्ये दि. २  मार्च रोजी सकाळी ८ ते ११ वेळेत सोयगाव नगर प्रदक्षीणा व कलश यात्रा निघणार आहे. हे.भ.प.जयश्रीताई महाराज तिकांडे संगमनेरकर यांचे काल्याचे कीर्तन सकाळी ९ ते १२ होणार आहे. त्यानंतर जवळच असलेल्या भैरवनाथ देवस्थान मंदिर महाप्रसादाचे आयोजन-१२ ते ३ या वेळेत केलेले आहे.सप्ताहात येणाऱ्या भाविक भक्तासाठी, महाराज मंडळीची राहण्याची व जेवनाची व्यवस्था विविध अन्नदात्यांनी केलेली आहे.त्याच प्रमाणे सप्ताहात चहापाणी व्यवस्था, पाणी व्यवस्था, जेवनाची व्यवस्था मंडप व्यवस्था, पत्रिका व साऊंड, जागा, व्हिडीओ शुटींग,  विणेकरी, अशा गायक, वादक, टाळकरी, चोपदार अनेक जबाबदाऱ्या विविध दात्यांनी घेतलेल्या आहेत. त्यासाठी संपर्क साधाः-९४२३४५४३३२, ९४२३४६४७३१, ८६००९०३४९७, तरी सोयगाव पंचक्रोशीतील भाविक भक्तानी व समाज बांधवानी या अमृत योगाचा लाभ घावा. असे आवाहन गांवकरी मंडळी व भैरवनाथ देवस्थान मंदिर प्रतिष्ठानच्या वतीने भैरवनाथ मंदिर संस्थानच्या वतीने आव्हान केले आहे.

# बळीराजा उपाशी, घोटाळेबाज तुपाशी

## विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचे टीकास्त्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे



बळीराजा देशोधडीला लागला आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी ठोस तरतूद केली नाही. धान, कापूस, सोयाबिन उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. महागाईमुळे शेतकरी पिचला आहे. शेतमालाला हमीभाव नाही. परंतु घोटाळेबाजांना मात्र या राज्यात चांगले दिवस आले असल्याचे टिकास्त्र विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी डागले आहे. त्याचबरोबर अपात्र अधिकाऱ्याना हवे ते पद देऊन सरकार हवी ती कामे करून घेत आहे. महत्वाच्या पदावरील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जात नाहीत. या मनमानीमुळे राज्य अधोगतीकडे निघाले आहे. अशा शब्दात श्री. वडेट्टीवार यांनी सरकारला खडेबोल सुनावले आहेत.
वडेट्टीवार म्हणाले, राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात आहे. मराठा विदर्भात गंभीर परिस्थिती आहे. तरी देखील सरकारची डोळेझाक सुरू आहे. राज्यात घोटाळ्यांची मालिका सुरू आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनातील घोषणांची अंमलबजावणी नाही. विदर्भातील, मराठवाड्यातील शेतकऱ्यांची, जनतेची फसवणूक केली आहे. शेतकरी आत्महत्या थांबत नाहीत. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत घोटाळा, ठाणे येथील मोघरपाडा मेट्रोच्या कामात घोटाळा,  रेट कॉंन्ट्रॅक घोटाळा, मिठागरांच्या जमिनींबाबतचा घोटाळा, जल जीवन मिशन घोटाळा, साडी घोटाळा, मोबाईल घोटाळा अशा घोटाळ्यांची मालिका राज्यात सुरू असून सरकारने या घोटाळ्यांमधील दोषींवर कारवाई केली पाहिजे. अशी मागणी श्री. वडेट्टीवार यांनी केली.

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी तीन स्थानिक सुट्या जाहीर; सभापती चव्हाण यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील निर्णयातील तरतुदीनुसार तसेच जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी प्रस्तावित केल्यानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी सन २०२४ या वर्षात मंगळवार, २ एप्रिल, संत एकनाथ महाराज कालाष्टमी, पैठण, बुधवार, दि.११ सप्टेंबर जर जरी बक्ष ऊरूस, खुलताबाद व गुरूवार ३१ ऑक्टोबर, २०२४ नरक चर्तुदशी या सणांनिमित्त विभागीय आयुक्त मधुकर आर्दड यांनी तीन स्थानिक सुझ्या जाहिर केल्या आहेत. उपरोक्त स्थानिक सुट्ट्या (राज्य न्यायालयाच्या अधिकार कक्षेतील कार्यालये, केंद्रीय प्रशासनातील कार्यालये व बँकेच्या कक्षेतील कार्यालयांखेरीज) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये, जिल्हा परिषदेच्या कक्षेतील कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यालये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शासकीय कोषागरे व महामंडळांची कार्यालये यांना लागू राहणार असल्याची माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना दिली.

# ताडोबाला जागतिक स्तरावर पोहचवण्यात योगदान देणाऱ्यांचा सन्मान करा : आ. जोरगेवार

## क्षेत्रसंचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांना सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :**  जगप्रसिध्द ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला जागतिक स्तरावर पोहचविण्यास वन्यप्राणी छायाचित्रकार, पत्रकार, वन्यजीव संरक्षण संस्था, वन विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी व जंगलांचे संरक्षण करणारे स्थानिक नागरिकांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यामुळे चंद्रपूरात आयोजित ताडोबा महोत्सवात त्यांचा सत्कार करण्यात यावा अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी वनसंरक्षक तथा ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांना केल्या आहे. सदर पत्रही त्यांनी पाठवले आहे.

वन विभागाच्या वतीने ताडोबा महोत्सव २०२४ चे आयोजन १ मार्च ते ३ मार्च २०२४ दरम्यान करण्यात आले आहे. ताडोबा महोत्सव 2024 चे उद्दिष्ट ताडोबाची यशोगाथा साजरी करणे आणि ती जागतिक मंचावर प्रकाशित करणे हि आहे. मात्र सदर महोत्सव साजरा करत असतांना ताडोबा व्याघ्रप्रकल्पातील प्राण्यांचे छायाचित्र आपल्या कॅमेर्यात टिपून येथील सौंदर्य जगात पोहोचविणार्या वन्यजीव छायाचित्रकरांचा विसर पडता कामा नये. त्यासोबतच अनेक पत्रकार वृतांकनच्या माध्यमातून ताडोब्याच्या प्रसिद्धीसाठी काम करीत आहे. तसेच वन्यजीव संस्था वन विभागातील कर्मचारी - अधिकारी यांच्या खांद्याला खांदा लावून वन्य प्राणी संरक्षणाचे ईश्वरीय कार्य करीत आहे. येथील स्थानिक नागरिकांनी या वनसंपत्तीचे संरक्षण केले आहे. यांच्या एकत्रित योगदानामुळेच आज ताडोबा व्याघ्रप्रकल्प जागतिक स्तरावर पोहचले आहे. या सर्वांच्या सामुहिक योगदानाशिवाय ताडोबा महोत्सवाची संकल्पनाच अपुरी राहील त्यामुळे अश्या आयोजनात ताडोबाच्या प्रसिद्धीत, संरक्षणात उल्लेखनीय योगदान असलेल्या या सर्व घटकांचा यथोचित सन्मान करून त्यांच्या सेवाकार्याची पावती देण्यात यावी अशा सूचना त्यांनी क्षेत्र संचालक डॉ जितेंद्र रामगावकर यांना पाठविलेल्या पत्रातुन केल्या आहे.




# दीक्षाभूमीच्या विकासासाठी घोषित 56 कोटी 90 लक्ष रुपयांच्या अंतिम टप्प्यात असलेल्या निविदेला मंजुरी द्या

## आ. किशोर जोरगेवार : अधिवेशनात बोलताना केली मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दिक्षाभुमीच्या विकासासाठी 56 कोटी 90 लक्ष रुपयांची घोषणा करण्यात आली आहे. हा प्रस्ताव शेवटच्या टप्प्यात असुन असुन तात्काळ सदर कामालाच्या निविदेला मंजुर प्रदान करण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना केली आहे. चंद्रपूर येथील पवित्र दिक्षाभुमीच्या विकासासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. सदर विकासकामासाठी 100 कोटी रुपयांचा निधी देण्याची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती. दरम्यान या कामासाठी 56 कोटी 90 लक्ष रुपयांचा निधीची घोषणा करण्यात आली असुन सदर प्रस्ताव अंतिम टप्यात आहे. मात्र आमची मागणी 100 कोटी रुपयांची होती. यातील केवळ 57 कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित निधीही मंजूर करण्यात यावा अशी मागणी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले कि, नागपूर नंतर केवळ चंद्रपूरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षा दिली. नागपूर येथील दिक्षाभुमीचा विकास झाला. मात्र चंद्रपूर येथील दिक्षाभुमीचा अपेक्षित असा विकास झालेला नाही. त्यामुळे सदर दिक्षाभुमीचा विकास करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे असेही ते यावेळी म्हणाले. चंद्रपूरसह सर्व विज उत्पादक जिल्हांना घरगुती वापरातील 200 युनिट विज मोफत देण्यात यावी ही मागणी पुन्हा एकदा अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली. यावर बोलतांना आ. जोरगेवार म्हणाले कि, जगातील सर्वात प्रदूषित असलेली थर्मल ऍनर्जी आम्ही निर्माण करतो. परिणामी प्रदुषण वाढत आहे. चंद्रपूर जिल्हाचा विचार केल्यास 2023 मध्ये 30 दिवसांपैकी 30 दिवस प्रदूषित होते. त्यामुळे श्वसनाचे, ह्रदयाचे आजार निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेता प्रदूषण नियत्रंण स्मॉग टावर उभारण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. सोबच उपमुख्यमंत्री यांनी सोलर एनर्जी च्या माध्यमातुन 300 युनिट मोफत देण्याची घोषणा केली आहे. मात्र या प्रक्रियेला वेळ लागणार आहे. त्यामुळे सर्व विज उत्पादक जिल्हांना 200 युनिट विज मोफत द्यावी अशी मागणी त्यांनी पून्हा एकदा अधिवेशनात केली आहे. सुरजागड येथे सर्वोतम दर्जाचे लोहखनिज मिळाले आहे. त्यामुळे लोहखनिजवर आधारीत उद्योग चंद्रपूरात सुरु करण्यात यावे असेही योवेळी ते म्हणाले.





# मातृभाषेतून राष्ट्राला बळकटी : प्राचार्या पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**मिरजगाव :** मातृभाषेतून मनुष्याच्या विचारांचे पोषण होते, त्यातून संस्कृतीचा विकास होतो आणि त्यामुळेच राष्ट्र बलवान होते म्हणून आपण मातृभाषेचा मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे असे विचार मराठी भाषा गौरव दिन तथा श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती प्रसंगी प्राचार्या साधना पाटील यांनी आपल्या भाषणातून मांडले.
प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षी देखील मराठी साहित्य प्रतिष्ठान तर्फे माहीजळगाव येथील श्री विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कुसुमाग्रज जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कवी इंद्रकुमार झांजे व कवी डॉ. शिंदे हेही उपस्थित होते कवी इंद्रकुमार झांजे यांनी स्वरचित कविता गाऊन विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले व कवी डॉ. शिवाजी शिंदे यांनीही आपल्या कविता गायल्या दहावी बोर्ड परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात कवी आ.य. पवार यांची गायिका मालती यांनी गायलेली 'कवठ' ही निसर्ग कविता विद्यार्थ्यांना ऐकविण्यात आली. टाकळी खंडेश्वरी येथील जलाशयात असलेल्या कवठाच्या झाडावर ही कविता केली गेली होती. सूत्रसंचालन इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी केले. विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता, पाठ्यपुस्तकातील कविता गायल्या. ज्येष्ठ शिक्षक श्री गवारे सर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले व कार्यक्रमाचा समारोप केला.

# राजेंद्र गायकवाड यांचा सेवानिवृत्ती समारंभ

## कुटुंब, नोकरीचे कर्तव्य प्रमाणिकपणे पार पाडले

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रयत शिक्षण संस्थेच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयात स्टाफ वेल्फेअर समितीच्या वतीने सेवानिवृत्ती शुभेच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या समारंभातील सत्कारमूर्ती असलेले राजेंद्र सिताराम गायकवाड यांचा विशेष सत्कार समारंभ संपन्न करण्यात आला. शाल श्रीफळ पुष्प आणि स्नेहाचे वस्त्र देऊन उभयतांचा सत्कार महाविद्यालय व कार्यालयीन सेवक यांच्या वतीने करण्यात आला.या प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव,कला विभागाचे उपप्राचार्य भीमराव काकडे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब सायमोते,मंजुळा गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सत्कारमूर्ती राजेंद्र सिताराम गायकवाड यांच्या बद्दल बोलत असताना प्रभारी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव म्हणाले की,गायकवाड सरांनी नोकरी व कुटुंब सांभाळीत असताना आपल्या कर्तव्याची जाणीव प्रत्येक क्षणाला ठेवलेली होती. अनेक वर्ष रयत शिक्षण संस्थेमध्ये काम करत असताना प्रामाणिकपणा, आपुलकी, स्नेह जपत असताना आपल्या कर्तव्याकडे कधीच त्यांनी दुर्लक्ष केले नव्हते. कुटुंबातील कर्तव्य नोकरीचे कर्तव्य दोन्हीही कर्तव्य त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडले आहेत हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य. त्यांच्यात पहावयास मिळाले.असे सुद्धा त्यांनी सांगितले. सत्कारमूर्ती राजेंद्र गायकवाड म्हणाले की, नोकरीच्या पहिल्या दिवसापासून मी माझ्या कर्तव्याशी एकनिष्ठ राहिलो.कामच हे माझे सर्वस्व मी मानले होते.अनेक ठिकाणी बदल्या झाल्या.परंतु दुःख न मानता आनंदाने त्याचा स्वीकार करत संपूर्ण सेवा मी संस्थेच्या, शाखेच्या हितासाठी घालवली.याचा मला आनंद होतो. यामध्ये माझे कुटुंब माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. यावेळी डॉ.संदीप शिंदे, प्रा.संकेत नालकर, संदीप शेंडगे, संजय खराडे यांनी त्यांच्याबरोबर कर्तव्य करत असताना आलेले विविध स्वरूपाचे अनुभव मनोगतातून व्यक्त केले.यावेळी त्यांची कन्या प्रियंका गायकवाड व मुलगा राहुल गायकवाड उपस्थित होते.तसेच महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रा.भीमराव काकडे यांनी मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पायल घोरपडे यांनी केले.






# ग्लोरी इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूल,शिरवळ ता.खंडाळा या शाळेतील विद्यार्थ्यांचा वार्षिक स्नेह संमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर नृत्य केले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा कार्यक्रम संपन्न होत असताना मान्यवर तसेच पालकवर्ग मोठया संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून वेंको कंपनीचे डेप्युटी मॅनेजर डॉ.गौतम गमे उपस्थित होते. योगेश सोनावणे,पालक प्रतिनिधी योगेश मराठे,स्वप्नील बनसोडे आदी सह इतर मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली.शाळेचे संस्थापक व मुख्याध्यापक जितेंद्र भणगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी शाळेच्या आजवरच्या आठवणींना उजाळा दिला. शाळेच्या उपमुख्याध्यापिका वैशाली भणगे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिला.प्रमुख पाहुणे डॉ.गौतम गमे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये ग्लोरी इंग्लिश मिडीयम स्कूल च्या सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.शाळेला यापुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.इयत्ता ८ वी तील विद्यार्थ्यांनी सादर केलेला किक्रेट वरील स्लो डान्स हा वार्षिक स्नेहसंमेलनातील खास आकर्षण ठरला.सर्वच गाण्यावर नृत्य सादरीकरणास पालकांनी जोरदारपणे टाळ्यांचा कडकडाट करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांच्या कलाविष्कारांना दाद दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल भणगे व हेमा दिक्षित यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेच्या उपमुख्याध्यापिका वैशाली भणगे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी किरण खोपडे,संतोष पवार, विद्या भारती,ज्योती लोखंडे, सोनल बर्गे,वर्षा शिंदे,नूतन जाधव, अर्चना गायकवाड, सोनाली बोराटे, वैशाली खोपडे, जया देमडे,दिपाली पवार,दिपाली कुंभार,सविता कांबळे,ओमिका चौधरी यांनी हातभार लावला.

# नसरापूर येथे जुने वडाचे झाड कोसळले

आधुनिक केसरी न्यूज



**नसरापूर :** तालुक्यातील नसरापूर येथे वेल्हे - नसरापूर मार्गावर मुख्य बाजारपेठ रस्त्यालगत जुने झाड कोसळले असून झाड कोसळल्याने काही काळ वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले. नसरापूर येथील सिद्धिविनायक हॉस्पिटल परिसरातील अनेक वर्षांचे जुने वडाची झाड आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र महावितरणच्या वीज वाहिनी खांबांचे तसेच तारांचे मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती कळताच महावितरणचे कर्मचारी कैलास मोहिते, रोहिदास रावलं, कैलास भोई, तसेच वन विभागाचे कर्मचारी तांबे सर पगडे सर, नसरापूर ग्रामपंचायत सदस्य सुधीर वाल्हेकर, माजी ग्रा स ज्ञानेश्वर झोरे, इरफान मुलांनी घटनास्थळी दाखल झाले. नसरापूर गाव चे स्थानिक नागरिक प्रज्योत कदम यांनी जेसीबी मशीन उपलब्ध करून दिल्याने झाड हटविण्यात आले. तर कांबरे खेबा गावचे तरुण दीपक शिंदे व संतोष शिंदे यांच्या सतर्कतेमुळे तीन मुलींना वाचवण्यात यश आल्याचे स्थानिकांनी सांगितले. कांबरे गावचे पोलीस पाटील सुमित कांबळे यांनी सतर्कता दाखवल्याने मोठा अनर्थ टळला आहे. नसरापूर परिसरात मुख्य रस्त्यालगत अनेक वर्षांची जुनी झाड असून परिसरातील नवीन गृहनिर्माण सोसायटयांमधील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सोय नसल्याने सोसायटी मधील नागरिक रात्री च्या वेळी रोड लागत जुन्या झाडांच्या परिसरात कचरा टाकत आहेत. परिणामी रस्त्यावर टाकलेला टाकत स्थानिक नागरिक त्याला त्या कचऱ्याचा त्रास होतो म्हणून पेटवल्याने झाडांचे नुकसान होत असल्याने अश्या दुर्दैवी घटना घडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. कचरा टाकणाऱ्यांवर ग्रामपचायत नसरापूर ने कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिक कित्येक वर्ष झाले करीत आहेत.

# आध्यात्मिक व जनसेवेतून ईश्वरकृपा हृदयात नांदते

## सौ. वेणीताई चव्हाण हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात नानजीभाई ठक्कर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आजच्या २१ व्या काळात जीवन जगताना आई वडिलांच्या वृद्धापकाळात त्यांची सेवा करणे हीच त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याची संधी असते. युवा पिढीने व्यसनापासून मुक्त व्हावे व आदर्श समाज घडविण्यासाठी प्रयत्नशील रहावे. अध्यात्म, सेवा ही दोन्ही मुल्ये प्रत्येक व्यक्तीने जीवनात आत्मसात करुन आपले जीवन आध्यात्ममय करावे.एकमेकांच्या सुखदुखात सहभागी होऊन आपुलकी जिव्हाळा मनात रुजवून आपण समाजाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी नातेसंबंध जपावे. अध्यात्मिक व जनसेवेतून ईश्वरकृपा हृदयात नांदते, असे प्रतिपादन दानशूर व्यक्तीमत्व नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी केले. ते तरडगाव ता.फलटण येथील सौ.वेणूताई चव्हाण हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते. येथील नुतन इमारतीच्या वास्तुपैकी दुसऱ्या विभागाचे वास्तुपूजन समारंभ दानशूर व्यक्तीमत्व नानजीभाई ठक्कर, ठाणावाला यांच्या शुभहस्ते संपन्न करण्यात आले.यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या भावना व्यक्त केल्या.शालेय विद्यार्थ्यांनी अभ्यास चिंतन करुन आपले जीवन समृद्ध करावे. उपस्थित असणाऱ्या युवकांच्या मध्ये हजारो स्वामी विवेकानंद आहेत.फक्त त्यांनी अंतःकरणात गुणांना वाव देऊन आपले कौशल्य समाजाप्रती समर्पित केले पाहिजे.असे सुद्धा नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी म्हटले.या संपूर्ण वास्तुची पाहणी नानजीभाई ठक्कर यांनी केली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती व गावातील प्रतिष्ठीत मान्यवर उपस्थित होते.यावेळी नानजीभाई ठक्कर यांचा सत्कार करताना त्यांना विठ्ठलाची मूर्ती भेट देण्यात आली. यावेळी फलटण पंचायत समितीचे माजी सभापती वसंतराव गायकवाड, तरडगावच्या सरपंच जयश्रीताई चव्हाण, सुभाषराव गायकवाड, कमिन्स कंपनीचे प्रविण गायकवाड, उपसरपंच प्रशांत गायकवाड, हरिपाळदादा राहेरकर, प्रमोददादा राहेरकर, प्राचार्य माने सर, रविंद्र गायकवाड, माऊली सेवा दलाचे अध्यक्ष सतिश गायकवाड, प्रकाश पारठे,



संदीप साप्ते, पर्यवेक्षक क्षीरसागर सर, तांबे सर, विकास चव्हाण, संदीप गायकवाड आदिंसह इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत ढोल लेझीमचे वाद्य वाजवीत करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणारत हा सोहळा संपन्न करण्यात आला. याच दरम्यान विद्यार्थ्यांचा सन्मान सुद्धा करण्यात आला. शालेय स्तरीय कबड्डी स्पर्धेत विजेता ठरलेल्या संघाला प्रशस्तीपत्रक व सातारा जिल्हा स्तरीय हॉलीबॉल स्पर्धमध्ये शाळेने पहिला क्रमांक मिळविला त्याबद्दल सुद्धा संपूर्ण संघाला प्रशस्तीपत्रक नानजीभाई यांच्या शुभहस्ते देण्यात आले.तसेच मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी प्रविण गायकवाड, हरिपाळदादा राहेरकर आदींनी मनोगते व्यक्त केली. लोणंद येथील डॉ.अमर बाबासाहेब शिंदे यांच्याकडून शाळेसाठी एक लाख रुपये मदत देण्यात आली. डॉ.अमर शिंदे यांच्या दातृत्वाबद्दल विशेष कौतुक करत त्यांचेही आभार मानण्यात आले. ही इमारत उभी अनेकांचे हात लाभलेले आहेत. यांमध्ये श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण, कमिन्स इंडिया प्रायव्हेट लि. सुरवडी,सर्व माजी विद्यार्थी व ग्रामस्थ तरडगाव व तरडगाव पंचक्रोशी यांच्या विशेष प्रयत्नातून हे शैक्षणिक वैभव उभे राहिलेले आहे.त्यामुळे तरडगावमध्ये विद्यार्थ्यांकरीता चांगल्या खोल्यांतील इमारत उभी झाल्याने पालकवर्ग विशेष समाधान व्यक्त करत आहेत.कार्यक्रम प्रसंगी प्रास्ताविक माने सर यांनी केले तसेच सुत्रसंचलन व आभार डांगे सर यांनी केले.



# धर्माबादेत बारावीची परीक्षा सुरळीतपणे सुरू; शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात बारावीची परीक्षा सुरळीतपणे सुरू असून २९ फेब्रुवारी रोजी नांदेड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांनी केंद्रास भेट देऊन पाहणी केली. परीक्षा सुरळीतपणे सुरू असल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. परीक्षा सुरू झाल्यापासून ते परीक्षा संपेपर्यंत तीन तास परीक्षा केंद्रावर तळ ठोकून होते.29 फेब्रुवारी रोजी इंग्रजी माध्यमाच्या रसायनशास्त्र विषयाच्या परीक्षेत ३२०-पैकी ३१७ विद्यार्थी उपस्थित होते.तर उर्दू माध्यमाचे ३३ पैकी ३३ विद्यार्थी परीक्षेत उपस्थित होते.दुपारच्या सत्रात कला शाखेतील 243 पैकी २४० तर उर्दू माध्यमाचे १८ पैकी १८ विद्यार्थी उपस्थित होते.शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांच्या पथकात एस.एल.वाघमारे.मोतीभाऊ केंद्रे यांचा समावेश होता. लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर कणसे,उपप्राचार्य प्रा.अमृतराव वानखेडे, डॉ.योगेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रसंचालक प्रा.के.जे. शेख, सहायक केंद्रसंचालक प्रा.अरविंद बोधनकर, एम.पी. जगदंबे आदीजण परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

# राष्ट्रवादी पक्षाची शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बांधणी : कपिल पवार

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून शिर्डी लोकसभा मतदारसंघात पक्ष वाढीसाठी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून पक्षाच्या सर्व पदाधिकारी अध्यक्ष उपाध्यक्ष व कार्यकर्ते यांना बरोबर घेऊन जनसंपर्क वाढवत एक विचाराने कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केल्याने राष्ट्रवादीचे शहरी व ग्रामीण भागात मोठी ताकद वाढली आहे पक्षाचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पाठबळ देखील मिळत आहे अशी माहिती राष्ट्रवादीचे नगर जिल्ह्यातील अध्यक्ष कपिल पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली

कपिल पवार म्हणाले की शिर्डी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दोन आमदार आहेत संगमनेर, श्रीरामपूर,राहता, नेवासा ह्या तालुक्यात आमदार इतर पक्षांचे आहेत त्यात संगमनेर मध्ये काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, राहता विधानसभा मतदारसंघात विद्यमान मंत्री नेते राधाकृष्ण विखे पा.श्रीरमपूर काँग्रेस तर नेवासा शिवसेनेचे



शंकरराव गडाख आमदार आहेत व हे सर्व मातब्बर असे नेते आहेत परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांनी पदभार घेताच जिल्हा पदाधिकारी व तालुका, शहराच्या पदाधिकारी निवडी करून प्रत्येक तालुक्यात पक्षाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन पक्षाची संघटना सक्रिय केली आहे, कोपरगावचे आमदार आशुतोष काळे व अकोलेचे आमदार किरण लहामटे व इतर सर्व सेलचे पदाधिकारी हि कार्यक्रम व पक्षवाढीसाठी वेळ देत असल्यामुळे संघटन वाढत आहे शिर्डी लोकसभा मतदारसंघात पक्ष संघटना अधिक मजबूतीने उभी रहात असल्याचे चित्र दिसत आहे याचा फायदा येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतीला होईल असा विश्वास कपिल पवार यांनी व्यक्त केला.



# श्रावणी श्रीरंग बनसोडचा तृतीय क्रमांक

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** विद्यार्थिनीचा समता विद्या मंदिर प्रार्थमिक व माध्यमिक शाळेने पटकविला फुलंब्री शहरांमधून प्रथम क्रमांक तथा तालुक्यातून तृतीय क्रमांक मिळविला आहे. शाळेच्या जल जीवन मिशन राज्यपाणी व स्वच्छता मिशन यांचे पत्र दिनांक 20/ 2 /2024 पंचायत समिती फुलंब्री कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार समता विद्या मंदिर प्राथमिक व माध्यमिक शाळेत निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी कुमारी. श्रावणी श्रीरंग बनसोड या विद्यार्थिनीचा तालुकास्तरीय तृतीय क्रमांक आलेला असून फुलंब्री शहरातून प्रथम क्रमांक घेतल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष त्रिंबकराव शिरसाठ यांनी तिचे अभिनंदन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. मालती ढोले/शिरसाट शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी यांना सर्वांनी अभिनंदन केले तसेच शाळेच्या वतीने पंचायत समिती फुलंब्री गट शिक्षणाधिकारी श्रीमती. धसवाडीकर मॅडम व विस्तार अधिकारी श्री. राजेश महाजन सर यांचे मुख्याध्यापिका मॅडम यांनी आभार मानले.

माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे नाना व भाजपा जिल्हा अध्यक्ष सुहासभाऊ शिरसाट, तालुकाध्यक्ष सांडू अण्णा जाधव, शहराध्यक्ष योगेश मिसाळ, भाजपा तालुका उपाध्यक्ष राम बनसोड, युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, भगवान निराशे, नगरसेवक बाबासाहेब शिंनगारे, गणेश राऊत, भाजपा चिटणीस सुमित प्रधान, नगरसेवक अजय शेरकर, संतोष जाधव, सुनील शेवाळे नागेश भारद्वाज, गणेश तारू, कृष्णा पात्रे, आकाश गोरावणे, अजय नागरे, राम हापत, पवन घोडके, संतोष आघाडे, नवाब पटेल या सर्वांनी श्रावणी राम बनसोड या विद्यार्थ्यांनीला खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# दशरथ ननावरे यांना शिवसमर्थ पुरस्कार जाहीर


आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** कुबडीतीर्थ ट्रस्ट यांच्या वतीने



दासनवमी निमित्त दिला जाणारा राज्यस्तरीय 'शिवसमर्थ पुरस्कार' हा खंडाळा येथील प्रेरणादायी वक्ते व इतिहास अभ्यासक दशरथ ननावरे यांना जाहीर करण्यात आलेला असून त्यांच्यावर विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे. मंगळवार दि.५ मार्च रोजी राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई आणि संतचरणरज बाळकृष्ण महाराज वसंतगडकर यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पाटण तालुक्यातील सडादाढोली येथील रामघळ



कुबडीतीर्थ ट्रस्टच्या वतीने गेले अनेक वर्षे सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना शिवसमर्थ पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षीचा हा पुरस्कार खंडाळा तालुक्यातील प्रेरणादायी वक्ते आणि इतिहासाचे अभ्यासक दशरथ ननावरे यांना देण्यात येणार आहे.दशरथ ननावरे यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक क्षेत्रात विशेष योगदान दिलेले आहे. विविध विषयांवर आधारित ते व्याख्यान देत असतात. तरुण पिढीला नेहमी प्रेरणा देण्याचे काम करत असतात. समाज प्रबोधनाच्या माध्यमातून जनजागृती करून तरुण पिढीला विधायक मार्गावर आणण्यासाठी ते विशेष प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्रात शिवचरित्र आणि सामाजिक विषयावरील व्याख्यांनातून समाज घडविण्याचा त्यांचा अखंड प्रयत्न राहिला आहे.तसेच शेकडो गडकिल्ल्यांच्या मोहिमेतून अभ्यासपूर्ण लेखन तसेच शिवचरित्रावरील प्रासंगिक लेखन केले आहे. त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

तसेच कोरोना काळात लोकांसाठी केलेले काम आणि अतिवृष्टीच्या काळात लोकांना केलेले सहकार्य या सर्वच बाबींचा विचार करून ट्रस्टने सन २०२४ चा हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. दशरथ ननावरे यांना पुरस्कार जाहीर होताच त्यांना अभिनंदन करण्यासाठी अनेक जण प्रत्यक्ष भेटी घेत आहेत.त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देत आहेत. हा पुरस्कार मिळाल्या बद्दल दशरथ ननावरे यांनी समाधान व्यक्त करत ट्रस्टचे आभार मानले आहेत.

# परीक्षार्थींना मारहाण; भाकपची चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लग्नानंतर नाव बदलले म्हणून अंगणवाडी पर्यवेक्षिका परीक्षेस बसु न देणाऱ्याची चौकशी करा व परिक्षार्थींना मारहाण करणाऱ्या पोलिस कर्मचारी यांचेवर कारवाई करा, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे जिल्हाधिकार्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जिल्हा परिषद अंतर्गत अंगणवाडी पर्यवेक्षिका पदभरती स्पर्धा परिक्षा घेण्याचे आयबीपीएस या खाजगी संस्थेस नियम धाब्यावर बसवून कंत्राट देण्यात आले आहे. सुरवातीपासूनच या कंपनीमार्फत स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे शोषण सुरू आहे. या संस्थेने परिक्षा फीस 1000 घेण्यात आली. इतकी फीस घेतल्यानंतरही कोणतीही सोयीसुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, तरीही नोकरीची गरज असणार्या विद्यार्थी विद्यार्थिनीनी कसबसे स्पर्धेत सहभागी होऊन आपले हॉलटिकीट मीळवले. माञ महिला विद्यार्थिनी यांच्या सन्मानाच्या केवळ बाता करणारे सरकारनी केवळ लग्नानंतर नाव बदलले म्हणून परिक्षेपासुन वंचित ठेवण्याचे आदेश दिले.



# बल्लारशाह रेल्वे स्थानकाला मिळणार गती

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** NRUCC सदस्य अजय दुबे आणि कामगार नेते पंकज परसराम यांनी आज नागपुरात नवनियुक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री मनीष अग्रवाल आणि CN.DCM श्री अमन मित्तल यांची भेट घेतली आणि रेल्वेच्या समस्या आणि सूचनांवर चर्चा केली. अधिकाऱ्यांनी सांगितले की आदिलाबाद - मुंबई नंदीग्राम एक्सप्रेस बल्लारशाह कडे वळविण्यात आली. मुंबई ते मुंबई धावण्याचा निर्णय घेण्यात आला असून रेल्वे बोर्डाकडून लॉन्चिंगची तारीख बाकी आहे.तसेच काझीपेठ पुणे ट्रेन बल्लारशाह ते आठवड्यातून तीन दिवस सुरू होण्याची शक्यता आहे. डीआरएम श्री अग्रवाल यांनी अमृत भारत योजनेंतर्गत बल्लारशाह रेल्वे स्थानकाच्या विकासकामांना गती देण्याचे निर्देश दिले, तसेच लवकरच बल्लारशाह येथे भेट देऊन स्थानिक समस्यांबाबत सविस्तर चर्चा करू, असे आश्वासन दिले व स्वच्छतेचे निकष न पाळल्याबद्दल कंत्राटदारावर कडक कारवाई करण्यात येत आहे.

# सलग दुसऱ्या दिवशी बेमौसमी पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सलग दुसऱ्या दिवशीही बेमौसमी पावसाने हजेरी लावल्याने रब्बी पिकांचे नुकसानी बरोबरच साखरपुडा लग्नकार्य करणाऱ्याचे झाल्याची चित्र होती. हिवाळ्याच्या शेवटच्या टप्प्यात बेमौसमी पाउस वादळी वाऱ्यासह झाल्याने रब्बी पिकांतील हरभरा मका बाजरी कांदा ज्वारी बाजरी गहू अंबे बार पिकाचे नुकसान झाले आहे. तर बुधवारी दि.२८ रोजी साखरपुडा लग्नकार्य कार्यक्रम असल्याने सकाळ दुपार पर्यंत आभाळ स्वच्छ चकचकीत होता तर दुपारनंतर सर्वत्र आभाळ आले व बेमौसमी पावसाला सुरुवात झाली. दुसऱ्या दिवसीही वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने लग्नकार्य करणाऱ्याचे हाल झाले.तर शेतातही उभी पिकें खराब झाली.ऊसतोड मजुर ऊस भरणे मजुर ट्रक्टर धारक ट्रकधारक बैलगाडी धारक यांचे थळातुन शेतातून ऊस रस्त्यावर आणण्यासाठी अक्षरशः हाल झाले व तारांबळ उडाली त्याप्रमाणेच विटभटटी थपाई उचल साठी हालहाल झाले दोन दिवस बेमौसमी पावसाने शेतकरी नागरिक शेतमजुरांना मोठा त्रास सहन करावा लागला हे विशेष.

# धुळ्यात चौथे अहिराणी साहित्य संमेलन

## एकपात्री प्रयोगासह होणार कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथील अहिराणी साहित्य परिषद व विद्यावर्धिनी सभा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. 3 मार्च रोजी राज्यस्तरीय चौथे अहिराणी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. विद्यावर्धिनी महाविद्यालयात स्व. अण्णासाहेब सदाशिवराव माळी साहित्य नगरीत सकाळी 9 ते सायंकाळी 7 पर्यंत होणाऱ्या संमेलनात पुरस्कार परस्कृतांच्या सन्मान, विविध विषयांवर चर्चा, कथाकथन, परिसंवाद, एकपात्री प्रयोगासह काव्य संमेलन होईल. त्यात विशाल खान्देशातील अहिराणी मायबोलीचा हा जागर होत असून त्यात सहभागी होण्याचे आवाहन परिषदेचे अध्यक्ष प्रा. भगवान पाटील यांनी आज पत्र परिषदेत केले.

शहरातील साक्री रोडवरील जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या हॉलमध्ये पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी सचिव प्रभाकर शेळके, सुमनताई महाले आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना प्रा. भगवान पाटील यांनी सांगितले की, संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी आ. प्रा. शरद पाटील तर अध्यक्षस्थान अक्षय छाजेड हे भुषविणार आहेत. या संमेलनात पुरस्कार पुरस्कृतांचा सन्मान करण्यात येणार असून त्यात डॉ. अरूण साळुंखे, विजय पाटील, श्रीमती



कलाावती माळी, प्रा. भालचंद्र साळुंखे, श्रीमती सुमन देसले यांचा समावेश आहे. तर प्रा. सदाशिव माळी यांना मरणोत्तर जीवनगौरव सन्मान दिला जाणार आहे. याबरोबरच उमविचे प्रथम कुलगुरू प्रा. डॉ. एन.के. ठाकरे, श्रीमती शंकुंतला बोरसे कुंभार यांनाही जीवन गौरव पुरस्कार दिला जाणार आहे. तर श्रीमती आशाताई रंधे, डी.डी.पाटील, प्रा.व्ही.के.भदाणे, प्रा. सुनिल गायकवाड, प्रा. बी.एन.पाटील, अविनाश पाटील, विश्वास बिरारी, नवोदित साहित्यीक प्रविण पवार यांचा सन्मान करण्यात येणार आहे. संमेलनात विविध विषयांवर चर्चा केली जाईल. तसेच कथाकथन, परिसंवाद, एकपात्री प्रयोग, काव्य संमेलन आयोजित करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. संमेलनासाठी अहिराणी साहित्य परिषद व विद्यावर्धिनी सभेच्या कार्यकारिणीचे सहकार्य लाभले म्हणून हे चौथे अहिराणी साहित्य संमेलन स्व.अण्णासो सदाशिव माळी साहित्य नगरीत कै. प.पू. ब.ना.कुंभार गुरूजी विचारमंचावर आयोजित करण्यात आले असून त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष माजी आ. शरद पाटील, अध्यक्ष अक्षय छाजेड, युवराज करनकाळ यांच्यावरतील करीत असल्याचेही प्रा. भगवान पाटील, सचिव शेळके यांनी सांगितले.

# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व जुनिअर कॉलेज दरेगावच्या दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज दरेगाव, ता. खुलताबाद येथे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे " अध्यक्ष डॉ .संजय गायकवाड सर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते व प्रमुख पाहुणे डॉक्टर दिलीप महालिंगे सर स्वामी विवेकानंद महाविद्यालय "नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख" हे होते सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते महाराजा सयाजीराव गायकवाड व आज विज्ञान दिनानिमित्त डॉक्टर सी. व्ही .रामन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेतील अनुभव व शिक्षणाबद्दल प्रेम कशी असते हे आम्हाला या शाळेने शिकविले पुढे डॉ. प्राचार्य संजय गायकवाड सर आपल्या अध्यक्षीय भाषणात मुलांना आपल्या ध्येयापर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक संधी असतात. त्या ओळखता आल्या पाहिजे मुलांनी स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी प्रशासनामध्ये उच्चपदे कोणती असतात याचे सखोल मार्गदर्शन केले.

आपल्या शाळेतील "स्पर्धा परीक्षक मार्गदर्शन केंद्राची" स्थापना करू आणि उच्च विद्याभूषित शिक्षकांची नेमणूक करू अशी ग्वाही डॉक्टर प्राचार्य गायकवाड सरांनी दिली. यानंतर



आपल्याला लाभलेले प्रमुख पाहुणे डॉ.महालिंगे सर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना ग्रामीण भागातील मुलांमध्ये अनेक गुण असतात हे विद्यार्थी कुठेही कमी पडत नाही. डॉ. महालिंगे सरांचे विद्यार्थी आज मोठ्या मोठ्या चित्रपटात सिरीयल मध्ये काम करत आहेत ते सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन आपल्या उच्च कारकीर्दीची सुरुवात त्यांनी केलेली आहे. असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रकाश वेताळ यांनी केले .तर शाळेचा अहवाल वाचन विश्वास नीळ यांनी केले. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी सर्व शिक्षक वृंद कारभारी साळुंकें,यशवंत पाटील, रवींद्र पवार, विष्णू गायकवाड, मंजुळनाथ भवरे, डॉ. बाळासाहेब निंभोरे, किरण ताकटे, राजु बनसोड, संतोष शिंदे' संजय देवकर, दत्तू गायकवाड, भरत काळे श्रीमती रंजना गायकवाड हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी पडूळे यांनी केले व आभार प्रदर्शन शांताराम कापडणे यांनी केले.

# ‘वंदे मातरम् चांदा’ कॉल सेंटरवरील प्राप्त तक्रारींचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नागरिकांच्या समस्या व तक्रारीचे त्वरित निराकरण करण्यासाठी तसेच शासकीय व्यवस्था सक्षम व सुदृढ करण्यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून ‘वंदे मातरम् चांदा’ तक्रार निवारण प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या अंतर्गत सर्व सरकारी विभाग ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर एका देखरेखीखाली आले आहेत. तुकूम येथे स्थित तक्रार निवारण प्रणालीच्या कॉल सेंटरला जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी भेट देऊन नागरिकांच्या प्राप्त तक्रारींचा आढावा घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, तांत्रिक सहाय्यक अनुराग गयनेवार आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, कॉल सेंटरला आतापर्यंत प्राप्त तक्रारीची यादी अद्ययावत ठेवावी.



तक्रारीचा विषय व सदर तक्रार कोणत्या विभागाशी संबंधित आहे, याबाबत माहिती उपलब्ध ठेवावी तसेच दैनंदिन तक्रारीची नोंद ठेवावी. ज्या तक्रारकर्त्यांचे प्रश्न प्रलंबित असतात व लवकर सुटत नाही, अशा तक्रारीबाबत प्रशासनाला कळवावे, अशा सूचनाही जिल्हाधिका-यांनी दिल्या. यावेळी गौडा यांनी आतापर्यंत प्राप्त तक्रारी, निराकरण करण्यात आलेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी तसेच कॉल सेंटरमधील कार्यरत चमु, दैनंदिन येणारे कॉल, याबाबत माहिती जाणून घेतली.

**आतापर्यंत 710 तक्रारींचे निराकरण :** ‘वंदे मातरम् चांदा’ या तक्रार निवारण प्रणालीवर आजपर्यंत 1038 तक्रारी प्राप्त झाल्या असून 710 तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे. उर्वरीत तक्रारी प्रक्रियेमध्ये आहे. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी स्वतः कॉल सेंटरच्या टोल-फ्री क्रमांकावर कॉल करून तपासणी केली. तसेच आतापर्यंत आलेल्या विविध तक्रारी जाणून घेतल्या.

**अशी नोंदवा तक्रार :** तक्रार नोंदवण्यासाठी 1800-233-8691 हा टोल फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे. कार्यालयीन वेळेत सोमवार ते शुक्रवार सकाळी 10 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत सदर टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल. टोल फ्री क्रमांकावरील प्राप्त तक्रारी VANDEMATARAMCHANDA.IN या संकेतस्थळावर नोंदविली जाईल व संबंधित विभागास पुढील कार्यवाही करिता पाठविण्यात येईल.

# बसने घेतला पेट; चालक, वाहकाचे प्रसंगावधान

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** भंगार बसेसमुळे राज्यभरात चर्चेत असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या गडचिरोली आगारावर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहे. आज, शुक्रवारी सकाळी मुलचेरा-घोट मार्गावर धावत्या बसने अचानक पेट घेतल्याने खळबळ उडाली होती. बसच्या चालक व वाहकाने प्रसंगावधान दाखवत जंगलातच बस थांबवून प्रवाशांना तात्काळ खाली उतरण्याच्या सूचना दिल्याने मोठा अनर्थ टळला.



मागील दोन वर्षांपासून जिल्ह्यातील गडचिरोली आणि अहेरी आगार भंगार बसेसमुळे कायम चर्चेत असतात. यापूर्वीही छप्पर उडालेल्या अवस्थेत धावणारी बस असो की पावसात छत्री घेऊन बसलेला चालक, अशा विविध कारणांनी गडचिरोलीतील प्रवासी वाहतूक राज्यभरात प्रसिध्दीझोतात आली होती. एकदा तर बसचे ‘वायपर’ खराब झाल्याने चालकाने चक्क हाताचा वापर करून बस चालविली होती. तशी चित्रफीत समाजमाध्यमांवर सार्वत्रिक झाली होती. विधिमंडळातही यावर चर्चा झाली. मात्र, त्यानंतरही परिस्थिती ‘जैसे थे’ आहे. दरम्यान, शुक्रवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास मुलचेऱ्याहून गडचिरोलीला जाण्यासाठी निघालेल्या बसने( एमएच- ०७ सी-९३१६ ) घोट मार्गावर जंगल परिसरात अचानक पेट घेतला. सदर बाब चालक व वाहकाच्या लक्षात येताच त्यांनी प्रसंगावधान दाखवत प्रवाशांना तात्काळ खाली उतरण्यास सांगितले. त्यामुळे प्रवासी सुखरूप आहेत. दरम्यान, बसच्या समोरील भागाला आग लागली होती. यावेळी बसमध्ये ७-१० प्रवासी असल्याचे कळते. बसमधील ‘बॅटरी’मुळे ही आग लागल्याचे आगार व्यवस्थापकांनी माध्यमांना सांगितले. अवेळी धावणाऱ्या भंगार बसेसमुळे जिल्ह्यातील नागरिकांचे प्रचंड हाल होत असताना आता जीव मुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ येत असल्याने तात्काळ यावर तोडगा काढावा अशी मागणी होत आहे.

# सुलवाडे प्रकल्पात सुधाकर बोरसे यांचे मोठे योगदान

## सरकार साहेब रावल यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** इंजि. सुधाकर बोरसे यांनी त्यांनीच सुलवाडे धरणाचा पाया रचला आहे. त्यांनी अनेक उल्लेखनिय कामे केली आहेत. त्यामुळे आज ते आपल्यात नसले तरी कामातून त्यांच्या स्मृती आजही जिवंत आहेत, असे प्रतिपादन विकासरत्न सरकार साहेब रावल यांनी ह्या ठिकाणी कार्यक्रमात सांगितले.

शिंदखेडा तालुक्यातील वर्षी गावाचे सुपुत्र कै. इंजि. सुधाकर बोरसे यांच्या स्मारकाचे अनावरण व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गावातील फार्म हाऊसवर झालेल्या या कार्यक्र माला विकासरत्न सरकारसाहेब रावल, माजी आ.रावर्धन कमदबांडे, जि.प.अध्यक्षा धरती देवरे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नारायण पाटील, गटनेते कामराज निकम, भाजपा जिल्हाध्यक्ष बबन चौधरी, जि.प. सदस्य पंकज कदम, चोपडा नगराध्यक्ष जीवनभाई, डॉ. माधुरी बाफना, उबाठा शिवसेनेचे महानगराध्यक्ष डॉ. सुशील महाजन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे



अभियंता आर. आर. पाटील, कार्यकारी अभियंता अभिजीत पाटील, शासकीय ठेकदार डी. आर. पाटील, जि.प.च्या माजी उपाध्यक्षा कुसूम निकम, इंजि. सुमित बोरसे, अमित बोरसे, जितेंद्र सोनवणे, सचिन दहिते, विरेंद्र गिरासे, संग्राम पाटील, डॉ. रवी सोनवणे, माजी महापौर जयश्री अहिरराव, गुड्डु अहिरराव आदी बोरसे परिवारातील सदस्य उपस्थित होते. इंजि. बोरसे यांचे शिल्प हे अहमदनगरचे शिल्पकार गवळी बंधुनी तयार केले. याशिल्पाचे अनावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी स्मारकाला पुष्प अर्पण करीत अभिवादन केले. यावेळी विकासरत्न सरकारसाहेब रावल म्हणाले की, आज सुलवाडे बॅरेज जे पाण्याने भरले आहे. त्याचा पाया कै. इंजि. बोरसे यांनी रचला आहे. तेव्हा इंजिनिअरींग कॉलेज हे फक्त धुळ्यात होते. तेव्हा कै. बोरसे यांनी इंजिनियरींगची पदवी घेतली. त्या काळात एखादी व्यक्ती खेड्यातून इंजिनियअर होते ही खुप मोठी गोष्ट आहे. त्यांनी सुलेवाडे बॅरेज, अनेक बंधाऱ्यांची कामे केली. त्यामुळे त्यांच्या स्मृती आजही त्यांच्या कामातून जिवंत आहेत. तसेच त्यांनी इंजिनिअर झाल्यानंतर आपल्या गावाकडेही लक्ष दिले.त्यामुळे आज इंजिअनिअर झाले किंवा आपल्याकडे एखादे पद असले तेव्हा आपण काहीतरी चांगले काम केले तर अशी स्मृती  राहते. आज अनेक इंजिनिअर होतात, मोठ्या शहरात स्थायीक होवून गावाकडे बघतही नाही.इंजिनिअरींग झाल्यानंतर तरूण जेमतेम नोकरी करतात. त्यामुळे इंजिनिअरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सहल आपण येथे घडवून आणू, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. निकवाडे यांनी केले. तर आभार डी. आर. पाटील यांनी मानले.

# माणूस घडवण्याचे विद्यापीठ म्हणजेच राष्ट्रीय सेवा योजना होय : डॉ. सर्जेराव जिगे

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व मॉडेल कॉलेज घनसावंगी चा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सात दिवशीय विशेष संस्कार शिबिराचे समारोप दिनांक 27 फेब्रुवारी रोजी मोजे राजेगांव येथे झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर मराठी भाषा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव जीगे  यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की" राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून युवकांचा सर्वांगीण विकास होतो. माती, नाती आणि संस्कृती जपण्याचे काम तसे संस्कारक्षम पिढी निर्माण या माध्यमातून होते. श्रमाची प्रतिष्ठा युवकांमध्ये  रुजविण्यात या शिबिरांचा मोलाचा वाटा आहे. मनातील अहंकार मीपणा जाऊन निष्काम कर्म करण्याची वृत्ती उद्दात्त भाव, देश प्रति समर्पण भाव अशा शिबिराच्या माध्यमातून युवकांमध्ये निर्माण होतो. खऱ्या अर्थाने माणूस घडविण्याचे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आहे. तसेच यावेळी राजभाषा मराठी गौरव दिन ही साजरा करण्यात आला. मराठी भाषा ही ज्ञानभाषा आहे. यात श्रेष्ठ साहित्य निर्माण झालेल असून देशातील प्रमुख भाषा असून तिचे अस्तित्व संपुष्टात येणार नसून आपण आपल्या या मायबोलीचा अभिमान बाळगला पाहिजे असे ते म्हणाले" अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ रामराव चव्हाण होते त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून  विवेकशील पिढी निर्माण होते असे सांगितले. मराठी विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब सोनवणे यांनी मराठी राजभाषा विषयी विचार प्रस्तुत केले.प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी बाळासाहेब वरखडे यांनी आभार प्राध्यापक भागवत गोरे यांनी तर सूत्रसंचालन आदित्य देशमुख यांनी केले. यावेळी प्रा. खंडू नवखंदे, गजानन उगले, कोरडे, रितेश मुळे, कीर्ती गायकवाड, डॉ. बाळासाहेब सोनवणे, डॉ. ऋषीं बाबा शिंदे यांची उपस्थिती.



# दुर्मिळ आजार असणाऱ्या रुग्णांसाठी हिमोफिलिया डे-केअर सेंटर कार्यान्वित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथील हिमोफिलिया डे केअर सेंटरचे उद्घाटन राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या हस्ते ऑनलाईन स्वरूपात करण्यात आले. हिमोफिलिया सारख्या दुर्मिळ आजार असणाऱ्या रुग्णांसाठी अपर मुख्य सचिव दीपक मैसेकर, आयुक्त धीरजकुमार तसेच संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्या मार्गदर्शनानुसार हिमोफिलिया डे केअर सेंटरचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय चंद्रपूर येथे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.भास्कर सोनारकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय राठोड, माया आत्राम, अधिपरिचारिका सपना बावणे, विकास वाढई, दीपक डंबारे उपस्थित होते.

हिमोफिलिया रुग्णांस वर्षातून 10 ते 12 वेळा रक्तस्त्राव होण्याची संभावना असते व त्याकरीता फॅक्टर 7, फॅक्टर 8(अ) व फॅक्टर 9(ब) रुग्णास आवश्यकता असते. जिल्ह्यामध्ये आजपर्यंत 28 रुग्णांची नोंद झाली असून संपूर्ण महाराष्ट्रात हिमोफिलिया रुग्णास आवश्यकता असणाऱ्या घटकांचा तुटवडा पडू न देण्याचा मानस आहे, असे राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यावेळी म्हणाले. म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये रुग्णांना अत्यावश्यक वेळी इतर कोणत्याही ठिकाणी जाण्याची गरज नसावी, याकरीता हिमोफिलिया सेंटर प्रत्येक जिल्ह्यात स्थापित केले आहे. यामध्ये प्रत्येक फॅक्टरची उपलब्धता असेल. पूर्वी या सुविधेचा लाभ घेण्यास रुग्णांना नागपूर येथे जावे लागत होते. मात्र, आता ही सुविधा चंद्रपूरमध्येच उपलब्ध झाली आहे. याचा उद्देश म्हणजे समुदायातील हिमोफिलिया असलेल्या व्यक्तींसाठी विशेष काळजी आणि समर्थन प्रदान करणे आहे. हा उपक्रम दुर्मिळ रक्तस्त्राव विकार आणि प्रभावित झालेल्या लोकांसाठी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी समर्पित आहे.

हिमोफिलिया डे केअर सेंटरमधील सुविधेचा लाभ घेण्याकरीता वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय राठोड 8830875244 व अधिपरिचारिका सपना बावणे 7387714867 यांच्याशी संपर्क साधावा. तसेच हिमोफिलिया सारख्या दुर्मिळ आजार असणाऱ्या रुग्णांसाठी हिमोफिलिया डे केअर सेंटर कार्यान्वित करण्यात आले असून रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

**वैद्यकीय सेवा :** हिमोफिलिया व्यवस्थापनामध्ये अनुभवी आरोग्य सेवा व्यावसायिक निदान, उपचार आणि देखरेख यासह सर्वसमावेशक वैद्यकीय सेवा प्रदान करणे.

**शिक्षण आणि समुपदेशन :** रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना हिमोफिलियाची समज वाढविण्यासाठी तसेच परिस्थिती प्रभावीपणे हाताळून त्यांना सक्षम करण्यासाठी शिक्षण व समुपदेशन सेवा प्रदान करण्यात येते.

**पोषक वातावरण :** हिमोफिलिया केंद्रामध्ये एक पोषक वातावरण असेल जिथे रुग्ण इतर हिमोफिलिया रुग्णांशी संपर्क साधून आपला अनुभव शेअर करू शकेल.

**आपत्कालीन प्रतिसाद :** अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांसह सुसज्ज, केंद्र आपत्कालीन परिस्थिती त्वरित आणि कार्यक्षमतेने हाताळणे.

# चंद्रपूरात शिव छत्रपती महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारा : आ. किशोर जोरगेवार

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना केली मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा 350 वा राज्याभिषेक सोहळा राज्यभर साजरा केला जात आहे. मात्र हे होत असतांना छत्रपती महाराज यांचा अश्वारूढ पुताळा चंद्रपूर सह राज्यातील अनेक जिल्हात आजही नाही. त्यामुळे जिथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा नाही त्या ठिकाणी पूर्णाकृती अश्वारूढ पुतळा तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घ्यावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात केली आहे. आज गुरुवारी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी अर्थसंकल्पाचा समर्थनार्थ आमदार किशोर जोरगेवार सभागृहात बोलत होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर मतदार संघातील विविध विषयांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी बोलताना ते म्हणाले कि, सुमारे 17 किलोमीटर लांबीचा परकोट असलेले चंद्रपूर हे पुरातन शहर आहे. येथे 500 वर्ष जून मंदिर असुन 2 हजार वर्ष जुनी माता महाकालीची मुर्ती येथे स्थापित आहे. मात्र पूरातत्व विभागाच्या जाचक अटिंमुळे मंदिराचा अपेक्षित असा विकास झालेला नाही. येथे चैत्र अश्विनी महिन्यात यात्रा भरते. देशभरातील भाविक येथे येतात त्यामुळे सदर यात्रा परिसराचा विकास करण्यात यावा अशी मागणी यावेळी बोलताना त्यांनी केली आहे.  चंद्रपुरातील इरई नदीला वारंवार पूर येत असतो. त्यामुळे मोठे नुकसान या भागातील नागरिकांचे होत आहे. त्यामुळे येथे पुर संरक्षण भिंत बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, विदर्भातील पंढरपूर असलेल्या वढा तिर्थ क्षेत्राला महाविकास आघाडी सरकारच्या वेळेस 25 कोटी रुपये देण्यात आले होते. मात्र ते मिळालेले नाही. त्यामुळे सदर निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा, जगात सर्वाधिक वाघांचा संरक्षण करणारा आमचा जिल्हा आहे. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारने येथे टायगर सफारीची घोषणा केली होती. 171 हेक्टर जागेत 286 कोटी रुपये खर्च करत टायगर सफारी निर्माण होणार होती. चंद्रपूरच्या विकासाला चालणा मिळणार असलेल्या या घोषित टायगर सफारीचे काम तात्काळ सुरु करण्यात यावे अशी मागणही यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

**काळा राम मंदिराचा पर्यटनदृष्ट्या विकास करा**
नाशिकला काळाराम मंदिर आहे. त्याच प्रमाणे चंद्रपूरलाही प्राचीन असे काळाराम मंदिर आहे. येथे जागाही उपलब्ध आहे. त्यामुळे या मंदिराच्या पर्यटनदृष्टा विकास करण्यासाठी 10 कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा अशी मागणी यावेळी अधिवेशनात बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# श्री मोहिनीराजांच्या यात्रेनिमित्त रेवड्यांची उधळण

## काल्याची फोडली दहीहंडी : श्री मोहिनीराजांच्या जयघोषाने नेवासे नगरी दुमदुमली

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** नगरीचे ग्रामदैवत व लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या श्री मोहिनीराज महाराजांच्या यात्रेनिमित्त मुख्य दिवशी गुरूवारी दि.२९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता रेवड्यांची उधळण करत काल्याची दहीहंडी फोडण्यात आली.यावेळी काला घेण्यासाठी हजारो भाविकांनी मंदिर प्रांगणात गर्दी केली होती. तर श्री मोहिनीराजांच्या जयघोषाने नेवासे नगरी दुमदुमली होती.श्री मोहिनीराजांच्या यात्रा महोत्सवाला रथसप्तमी पासून प्रारंभ झाला होता सप्ताहभर येथे भागवत कथा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली त्यानंतर माघ पौर्णिमेला भळंदचा कार्यक्रम होऊन सलग पाच दिवस श्री मोहीनीराजांच्या उत्सवमूर्ती समोर महाप्रसादाच्या पंगती बसल्या. सायंकाळच्या सुमारास झालेल्या महाप्रसाद पंगती कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यात्रा उत्सव काळात गुरुवर्य भास्करगिरी महाराज,उद्धव महाराज मंडलिक, आमदार शंकरराव गडाख,माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, भाजपचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे यांनी भेट देऊन उत्सवमूर्तीसह मोहिनीराजांचे दर्शन घेतले. गुरूवारी दि.२९ फेब्रुवारी रोजी यात्रेच्या मुख्य दिवशी श्री मोहिनीराज मंगल कार्यालयामध्ये दुपारी उत्सवमूर्ती समोर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला त्यानंतर सायंकाळी ६ च्या सुमारास पाकशाळा येथे मानानुसार येथील न्यायाधीश महोदयांच्या हस्ते पालखीची पूजा करण्यात आली आणि पाकशाळा येथूनच उत्सवमूर्तीच्या पालखी मिरवणुकीला प्रारंभ झाला. "बोल मोहिनीराज की जय"असा जयघोष करत व गुलालाची उधळण करत पालखीचे श्री मोहिनीराजांच्या मंदिराकडे प्रस्थान झाले यावेळी टाळमृदुंगाचासह सनई चौघडयाचा गजर करत आलेल्या पालखी मिरवणुकीचे सुवासिनींनी औक्षण करून स्वागत केले. पालखीचे आगमन श्री मोहिनीराजांच्या मंदिर प्रांगणात झाल्यानंतर येथे रेवड्यांची उधळण करत हजारो भाविकांच्या उपस्थितीत पाटील घराण्यातील मानाप्रमाणे बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते काल्याची दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी उधळलेल्या रेवड्या झेलण्यासाठी व काला घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती तर देशपांडे गल्लीमध्ये घरोघरी काल्याचे वाटप करण्यात आले. काल्याचा प्रसाद घेण्यासाठी श्री मोहिनीराज मंदिर प्रांगण गर्दीने फुलून गेले होते. तर मुख्य पेठेला ही यात्रेमुळे मोठी गर्दी झाली होती. गुरुवारी रात्री पालखी ग्रामप्रदक्षिणेसाठी निघाली यावेळी सुवासिनींनी पंचारती ओवाळून



उत्सवमूर्तीचे औक्षण केले.तोफांची सलामी व फटाक्यांची आतषबाजीने ग्रामप्रदक्षिणेसाठी निघालेल्या पालखीचे उत्स्फूर्त स्वागत नेवासा शहरासह मुख्य पेठेत व नेवासा बुद्रुक व परिसरात करण्यात आले. शुक्रवारी दि.१ मार्च रोजी कुस्त्यांच्या जंगी हंगाम्याने पंधरा दिवस चालणाऱ्या श्री मोहिनीराजांच्या यात्रेची सांगता होणार आहे. बाजार तळावरील प्रांगणात रहाट पाळण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली होती.

विविध संघटना व संस्थेच्या वतीने नेवासा शहरातील चौकाचौकात व ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या.नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# धुळे शहर मतदारसंघात सर्वात जास्त इमारती उभारण्याचा विक्रम आ.फारुख शाह यांनी केला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रोजी धुळे शहराचे आ.फारूख शाह साहेब यांच्या हस्ते प्रशासकीय इमारतीच्या कामाचा शुभारंभ आज करण्यात आला. धुळे शहराच्या विविध भागात असलेली सर्व शासकीय नीमशासकीय कार्यालये एकाच छताखाली येण्याच्यादृष्टीने तसेच शहरातील भाडे तत्वावर असलेले सर्व शासकीय निम शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्याचा प्रयत्न यशस्वी करण्याचे महत्त्वपूर्ण काम आ.फारुख शाह यांनी यानिमित्ताने केलेले आहे. आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नाने आतापर्यंत धुळेकर नागरिकांना प्रशासकीय सुविधा सक्षमपणे उपलब्ध व्हावी म्हणून विविध कार्यालये उभारण्यात आली आहेत. त्यात प्रामुख्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाची इमारत,एम. आय. डी.सी.प्रादेशिक कार्यालय इमारत व सुसज्ज अग्निशमन केंद्र,शासकीय तंत्रनिकेतन ग्रंथालय इमारत,आदिवासी प्रकल्प कार्यालय इमारत, आय.टी.आय. इमारत,आर. टी.ओ.कार्यालय इमारत,न्यायाधीश निवासस्थान, तसेच आदिवासी मुलींचे व मुलांचे वसतिगृह,भा. हि. वै.महाविद्यालयात क्लास रूम,ग्रंथालय,व निवासी अधिकारी निवासस्थान ,कारागृह इमारत,शहरातील ४ ठिकाणी अभ्यासिका याचा समावेश आहे. गेल्या चार वर्षात सर्वात जास्त प्रशासकीय इमारती बांधण्याचा विक्रम आ.फारुख शाह यांनी केलेला आहे. साधारणतः शहरातील ३८ ठिकाणी शासनाचे भाडेतत्वावर वेगवेगळे कार्यालये आहेत. या कार्यालयांच्या भाड्या पोटी शासनाला दर माह ४० ते ५० लाख रुपये द्यावे लागतात. तसेच ही कार्यालये शहरात दूर दूर पर्यंत विखुरलेली असल्याने जनतेला दैनंदिन कामे करण्यासाठी हेलपाटे मारावे लागतात त्यामुळे जनतेच्या पदरी मनस्तापच येतो तसेच जनतेचा पैसा आणि वेळ वाया जातो हि समस्या पाहता आ.फारूख शाह यांनी या साठी पाठपुरावा करत या प्रशासकीय इमारतीच्या कामा साठी सुमारे ४० कोटी रुपयाचा निधी मंजूर करून आणला असून या कामाचा शुभारंभ आज आ.फारूख शाह यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आ.फारुख शाह यांचेसोबत सार्व.बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता आर.आर. पाटील, उपअभियंता धर्मेंद्र झाल्टे, कनिष्ठ अभियंता लोकरे ,नासिर पठाण, सईद बेग, डॉ.दीपश्री नाईक, युसुफ पापा सर, आसिफ शाह, इकबाल शाह, निजाम सैय्यद, प्यारेलाल पिंजारी, डॉ.बापुराव पवार, हारुण खाटीक, इब्राहीम पठाण, छोटू मच्छीवाले, निसार शाह, जाहीद अन्सारी, ईलियास अन्सारी, सऊद आलम, सलमान खान,फैजल अन्सारी, गोलू शाह, समीर शाह उपस्थित होते.

# विकास महामंडळाकडून महिला दिनानिमित्त रणरागिणींच्या सन्मानार्थ आकर्षक सवलती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** संपूर्ण जगभरामध्ये 8 मार्च हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. महिलांचा पर्यटन क्षेत्रातील सहभाग महिलांच्या आर्थिक विकासासाठी एक चांगले साधन ठरु शकते. पर्यटन क्षेत्रात महिलांमध्ये उद्योजकता आणि नेवृत्व गुण विकसित करणे तसेच राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला केंद्रित/लिंग समावेशक पर्यटन धोरण दिनांक 19 जुन 2023 रोजी महाराष्ट्र शासनाव्दारे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहे त्यानूषंगाने महामंडळाच्या सर्व पर्यटक निवासांनी तसेच पर्यटक निवास छत्रपती संभाजीनगर व अर्का उपहारगृह, खारघर यांनी महाराष्ट्र शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार सर्व बाबींची अंमलबजावणी करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आलेली होती. महामंडळाचे अंमलबजावणी करण्याच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन सदर योजना यशस्वीरित्या राबविण्यात येणार असुन त्यानुषंगाने सर्व प्रादेशिक कार्यालये व पर्यटक निवासे येथे "आई"महिला केंद्रित / लिंग समावेशक पर्यटन धोरण राबविण्यात येणार आहे.

पर्यटनाप्रमाणेच अगदी सगळयाच क्षेत्रामध्ये अग्रेसरपणे, खंबीरपणे परिस्थितींचा सामना करणाऱ्या रणरागिणींना / महिलांना अधिक सक्षम करणेकरीता तसेच त्यांच्या प्रति असलेला आदर, सन्मान, प्रेम व्यक्त करण्यासाठी आपण प्रयत्नशील असणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याची भावना व्यक्त होत असते. त्यास अनुसरुन मा. पर्यटन सचिव जयश्री भोज मॅडम आणि मा. व्यवस्थापकिय संचालिका श्रीमती श्रध्दा जोशी-शर्मा मॅडम यांच्या संकल्पनेतुन दि. 8 मार्च 2022 रोजी महिला दिनाचे औचित्य साधत दि. 1 मार्च 2024 ते 08 मार्च 2024 या दिवसांसाठी / कालावधीत महामंडळाच्या पर्यटक निवासामध्ये वास्तव्यास येणाऱ्या महिला अतिथिंना आणि त्यांच्या परिवारास निवासकक्ष आरक्षणावर 50% सूट देण्याबाबत मान्यता दिली आहे. सदर 50% आरक्षणावरील सवलत फक्त दि. ०१ मार्च ते ८मार्च २०२४ या कालावधीकरिताच देण्यात आलेली आहे. तसेच सदरच्या सवलती हया फक्त निवास कक्ष आरक्षणावर ५०% सवलत असून त्यानुसार EP प्लॅन (ONLY ROOM) ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. उपहारगृहांमधील सकाळचा नाश्ता, दुपारचे आणि रात्रीचे जेवण यासाठी ही सवलत लागु नाही. महिला दिनाच्या औचित्याने देण्यात आलेल्या आरक्षण सवलतींना अनुसरुन एखाद्या महिलेने कक्षाचे आरक्षण केल्यास सदर आरक्षण रद्द करता येणार नाही, तसेच ज्या महिलांच्या नावे आरक्षण असेल त्या महिलांनी त्या ठिकाणी आपल्या ओळखपत्रासह उपस्थित राहणे अनिवार्य असणार आहे. महामंडळाच्या पर्यटक निवासांमध्ये आलेल्या महिला अतिथीचे आगमन होताच त्यांचे विशेष स्वागत करण्यात येणार आहे. माहिती तंत्रज्ञान शाखेद्वारे सर्व पर्यटक निवास व्यवस्थापक यांना महिला अतिथीना 50% आरक्षण सवलत देणेकरिता आवश्यक PROMO CODES संकेतस्थळावर (WWW.MTDC.CO) उपलब्ध करुन देण्यात आलेली असुन त्यामुळे सदर आरक्षणे पारदर्शक आणि सुरळीत होणार आहेत. PROMO CODES हे महामंडळाद्वारे भाडेतत्वावर देण्यात आलेल्या पर्यटक निवासासाठी लागु नाहीत. तसेच या सवलती फक्त निवास कक्ष आरक्षणास वैध असून EXTRA BEDS तसेच CONFERENCE HALLS, LAWNS करीता लागू असणार नाहीत.

महामंडळाच्या काही पर्यटक निवासामध्ये महीलांसाठी खास उपक्रम / हेल्थ झोन तयार करण्यात येणार आहे. या इनडोअर उप्रकम / हेल्थ झोन मध्ये योगा, झुंबा, डान्स, अरोबिक प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सदरच्या झोनमध्ये मोठा टी.व्ही. आणि स्पिकरचीही सोय करण्यात आली आहे. या ठिकाणी महीलांना आपल्या आरोग्यासाठी विविध प्रकारे व्यायाम करता येणार आहे. खास महीलांसाठी आणि पर्यटक निवासात येणाऱ्या पर्यटकांसाठी ओपन जीम ची सोय करण्यात येणार असुन या ठिकाणी मुलांसाठी खेळणी देण्यात येणार आहेत. या ओपन जीम साठी उच्च दर्जाचे रबरी फ्लोरींगचा वापर करण्यात येणार आहे. या ठिकाणी महीलांसाठी टीम बिल्डींग ॲक्टीव्हिटी घेण्यात येणार आहेत.पर्यटन क्षेत्रात महीलांचा सहभाग वाढत असल्याने आणि पर्यटनास नव्याने चालना मिळत आहे. त्यामुळे महामंडळाची सर्वच पर्यटक निवासे मोठया प्रमाणावर आरक्षित होत असुन या उत्साही वातावरणामध्ये सदरच्या सवलतींमुळे पर्यटनाचा आनंद द्विगुणीत तर होणार आहेच, पण महामंडळाकडुन रणरागिणींचा सन्मान केला जात असल्याने महिला पर्यटकांमधुनही समाधान व्यक्त होत असल्याची माहीती महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्री. दिपक हरणे यांनी दिली. दिपक हरणे, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ.

# अर्थसंकल्पात घोषणांचा सुकाळ, शेतकऱ्यांसाठी निधीचा दुष्काळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प गोरगरीब, सामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवा पिढी, मागासवर्गीय या सर्वांचा भ्रमनिरास करणारा आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सरकारने अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस पाडला.राज्याची आर्थिक स्थिती बिघडवणारा, धळपट्टीला आणि भ्रष्टाचाराला वाव देणारा अर्थसंकल्प असल्याने राज्यविधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी कामकाज सुरू होण्यापूर्वीच विधिमंडळ परिसरात विरोधक आक्रमक होत 'अर्थसंकल्पात घोषणांचा सुकाळ शेतकऱ्यांसाठी निधीचा दुष्काळ, अर्थसंकल्पात गोलमाल कंत्राटदार मालामाल म्हणत सरकारच्या विरोधात विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जोरदार निदर्शने केली. विधानसभा आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आणि महाविकास आघाडीच्या आमदारांनी अंतरिम अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीही ट्रिपल इंजिन सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, राज्याला कर्जबाजारी करणाऱ्या सरकारचा, कामगारांच्या तोंडाला पाने पुसणाऱ्या सरकारचा, जनतेवर कर्जाचा डोंगर लादणाऱ्या सरकारचा, जुनी पेन्शन बद्दल खोटी आश्वासन देणाऱ्या सरकारचा, पाणी न देणाऱ्या सरकारचा, धिक्कार असो अशा घोषणा देत वि निषेध केला. यावेळी काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात, सतेज बंटी पाटील, अभिजित वंजारी, नितीन राऊत, विकास ठाकरे, संग्राम थोपटे, सुरेश वरपुडकर, प्रतिभा धानोरकर, सचिन अहिर, रमेश कोडगावकर, विलास पोतनीस, सुनील शिंदे, राजन साळवी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रोहित पवार, सुनील भुसारा, यांच्यासह विरोधी पक्षाच्या आमदारांनी राज्यात विकासाच्या नावाखाली घोर फसवणूक करणाऱ्या सरकारच्या विरोधात 'अर्थसंकल्पात गोलमाल कंत्राटदार मालामाल, सत्ताधारी आमदार तुपाशी जनता मात्र उपाशी, विक्रमी पुरवणी मागण्या आमदार फोडण्यासाठी आणि फोडलेले सांभाळण्यासाठी या घोषणा, लिहिलेले फलक हातात घेत जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला



# रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे मराठी दिन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मराठी ही आमची मातृभाषा असून तिचं संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे. यासाठी आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर सातत्याने करण्यात यावा आणि तरुणांनी मराठीच्या संवर्धनासाठी पुढे यावे. असे आवाहन ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी केले. रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सद्वारे आयोजित मराठी गौरव दिनाच्या अनुषंगाने ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. मारोती वाघ, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य सौ. अर्चना कहाळे पत्की, मराठी विभाग प्रमुख तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी, रा. तु.म. नागपूर विद्यापीठ



नागपूरचे मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. संगीत विभाग प्रमुख प्रा. सचिन देशमुख आणि प्रा. हर्षल रोठे यांनी स्वागत गीत सादर केले. डॉ . रवींद्र शोभणे यांनी मराठी भाषा ही सार्वत्रिक भाषा व्हावी, मराठी भाषा ही सौंदर्य प्रधान भाषा कशी होईल, आणि मराठी भाषेला चांगला दर्जा कसा मिळेल यासाठी विद्यार्थ्यांशी लहान लहान उदाहरणांच्या माध्यमातून संवाद साधला. तर डॉ.शैलेंद्र लेंडे यांनी मराठी भाषा गौरव दिनाच्या औचितत्याने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये दिसून आलेला उत्साह आणि सांस्कृतिक विभाग व मराठी विभाग प्रमुख म्हणून सायली लाखे मॅडम यांचे कौतुक केले. मराठी भाषा ही भारताची प्राचीन भाषा आहे भक्ती काळात महाराष्ट्रातील संतांनी आपल्या सुर्जनांनी ती समृद्ध केली तर आधुनिक काळात अनेक लेखकांनी मराठी भाषा समृद्ध केली. कुसुमाग्रज हे मराठी भाषेचे अभिमानाचे प्रतीक म्हणून ओळखले जातात, असे वक्तव्य डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक करताना मराठी विभागप्रमुख सायली लाखे पिदळी यांनी या कार्यक्रमाच्या आयोजना मागची भूमिका विशद करत असताना या महाविद्यालयाच्या वतीने मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टिकोनातून आणि विद्यार्थ्यांमध्ये मराठीची आवड निर्माण व्हावी म्हणून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून हस्तलिखित लिहून घेतले असून त्याचे विमोचन आज होणार असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या औचित्ताने महाविद्यालयात आलेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचा यावेळी महाविद्यालयाच्या वतीने व संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना संस्थेचे सचिव डॉ.मारोती वाघ यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे हे या कार्यक्रमासाठी आल्याने या महाविद्यालयासाठी भूषणावाह बाब आहे असे नमूद केले. आणि मराठी संवर्धनासाठी महाविद्यालयाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या पहिल्या हस्तलिखित शब्दगंधाचे कौतुक केले.

## दुचाकी अपघातामधील जखमीचाही मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** २८ फेब्रुवारी रोजी रात्री नादुर्खी रोडवर झालेल्या



दुदेवी दुचाकी अपघातात जखमी झालेल्या सत्यम कुहीले याचा नाशिक येथे उपचार घेत असताना दुदैवी मृत्यू झाला असून या अपघातात मृत्यू झालेल्याची सख्या आता दोन झाली आहे. मोटारसायकल वरिल नियंत्रण सुटल्याने झाडावर आढळून झालेले अपघातात दुचाकी साहिल सुदाम गोंदकर वय २५ याचा अतिरक्तस्राव झाल्याने मृत्यू झाला होता. पाठीमागे बसलेला सत्यम कुहीले वय २५ हा जखमी झाला. अपघात होताच नागरिकांनी दोघांना तात्काळ लगतच्या शिर्डी शहरातील साईबाबा सुपर हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. दुचाकीच्या पाठीमागे बसलेल्या सत्यम कुहिले वय २५ याला उपचारासाठी नाशिक येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते परतु मयत साहील गोदकर यांच्या पाठोपाठ त्याचा जिवलग मित्र व दुचाकीवर असणारा सत्यम कुहीले याच्या निधनामुळे शिर्डी शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी शिर्डी ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर हजर होते.



## ग्रामदैवत हजरत सय्यद जमाल शहा बाबांना भाजपाच्या वतीने चादर अर्पण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहराचे सर्व धर्म समभावाचे प्रतीक व ग्रामदैवत हजरत सय्यद जमाल शहावली दर्गा उरूस 163 व्या निमित्त फुलंब्री शहर व भाजपाच्या वतीने चादर अर्पण करून जमाल शहा बाबाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले या प्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ भाजपा तालुका उपाध्यक्ष राम बनसोड भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष वाल्मीक जाधव पोलीस निरीक्षक संजय सहाने तसेच भाजपा पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महिला दिनानिमित्त समर्थ सेवामार्गाचे योगशिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर जि. नाशिक आणि सद्गुरू मोरेदादा हॉस्पिटल अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांचे वतीने महिला सक्षमीकरण व आरोग्यदूत विभागांतर्गत महिला भगिनींना शारीरिक व मानसिक आजारांपासून सुटका मिळावी त्यांचे आरोग्य निरोगी व तणावमुक्त व्हावे,त्यांना व्याधीमुक्त होऊन आनंदी जीवन जगता यावे यासाठी दि.08 मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त भारतभर मोफत "सूर्यनमस्कार व योगासने,प्राणायाम शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

पूर्वतयारी म्हणून आरोग्यदूत प्रतिनिधींसाठी "सूर्यनमस्कार, योगासने प्राणायाम प्रशिक्षण शिबिर" दि.25 फेब्रुवारी रोजी गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथे यशस्वीपणे संपन्न झाले. यात 300 सेवेकरी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता. जागतिक महिला दिन निमित्त सर्वांसाठी भारतभर केंद्रनिहाय, शाळा, कॉलेज, सार्वजनिक उद्यान, हॉल या ठिकाणी एकदिवसीय सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम शिबीराचे आयोजन करण्यात येईल. जास्तीत जास्त महिला भगिनींनी या एकदिवसीय मोफत योग शिबिरात सहभागी व्हावे, या ठिकाणी तज्ञ योगशिक्षक प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत, त्याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन गुरुपीठ व्यवस्थापक चंद्रकांतदादा मोरे यांनी केले आहे.

दि.08 मार्च 2024 रोजी जागतिक महिला दिनानिमित्त भारतभर आयोजित या केंद्रनिहाय सूर्यनमस्कार व योगासने,प्राणायाम शिबीरात जास्तीत जास्त महिला सेवेकरी भगिनी यांनी आरोग्यदूत प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहून सेवेची जबाबदारी घ्यावी, आपले आरोग्य निरोगी व आनंदी ठेवण्यासाठी "सूर्यनमस्कार व योगासने,प्राणायाम " प्रात्यक्षिक शिबिरात सहभागी व्हावे हीआणि वर्षभर परिसरातील केंद्राच्या माध्यमातून सक्रिय व्हावे असे आवाहनही करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.08 मार्च रोजी सकाळी ठीक 7:30 वाजता आपल्या परिसरातील श्री स्वामी समर्थ केंद्रात किंवा ठरलेल्या स्थळी योग वर्ग सुरू होईल याची शिबिरार्थींनी नोंद घ्यावी.

सोबत येताना ड्रेस कोड (सफेद), आसन- योगा मॅट /सतरंजी,पाणी बॉटल,1छोटा नॅपकिन घेऊन यावे, अशी सूचनाही करण्यात आली आहे.



## बाजार सावंगी येथील निकिता नलावडे वनरक्षकपदी निवड झाल्याने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील महिला विद्यार्थिनी वनविभागातर्फे घेण्यात आलेल्या वनरक्षक परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने व तिची यवतमाळ जिल्हा वनविभागातः वनरक्षकः पदी नियुक्ती झाल्याने ग्रामवासियांच्या वतीने सत्कार करून अभिनंदन केले.

प्रथमच एक महिला वनविभागात नियुक्तीने ग्रामस्थांमध्ये समाधान व आनंदी वातावरणाने उत्स्फूर्त स्वागत झाले.

निकिता नवनाथ नलावडे हिची निवड झाल्याने सरपंच आप्पाराव नलावडे भाजपा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे यांनी रेणुका माता मंदिर सभागृहात शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला चेअरमन किशोर नलावडेपोपट काटकर अशोक नलावडे सोमीनाथ नलावडे भाऊसाहेब नलावडे जमादार दिलीप बनसोड आनंदा काटकर भाऊसाहेब काटकर कल्याण शिवाजी काटकर श्री जाधव जगन्नाथ काटकर आई वडील व महिलांची उपस्थिती होती.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर